रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १८१
www.ramprahar.com

बुधवार, १७ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## स्टार्टअप रँकिंग क्रमवारीत महाराष्ट्र टॉप परफॉर्मर



**नवी दिल्ली :** केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या व्यापार आणि उद्योग संवर्धन विभागाच्या वतीने राज्यांच्या स्टार्टअप रँकिंग कार्यक्रमाच्या चौथ्या आवृत्तीमध्ये स्टार्टअप संस्थांसाठीच्या सहाय्य कामगिरीच्या क्रमवारीत महाराष्ट्राने टॉप परफॉर्मर म्हणून क्रमांक पटकाविला. या क्रमवारीवर आधारित २०२२च्या आवृत्तीच्या निकालाची घोषणा आणि सत्कार समारंभ मंगळवारी (दि.१६) केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे झाला. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रमोद शिंदे, सहाय्यक व्यवस्थापक अमित कोठावदे व विवेक मोगल या टीमने हा पुरस्कार स्वीकारला.

## अंतरंग

भाजप प्रदेश कार्यालयात श्रीराम दर्शन रथाचे स्वागत/२
मासळीची आवक घटल्याने दर वाढले/५
राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत रायगड-मुंबई सलामीची लढत/८

# झोपेचे सोंग घेतलेल्यांना कसे उठवणार?

■ विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांचा ठाकरे गटावर पलटवार



**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी (दि.१६) मुंबईतील वरळी येथे महापत्रकार परिषद घेतली. या वेळी त्यांनी शिवसेना सत्तासंघर्षावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालावर टीका व आरोप केले. ठाकरे गटाच्या या पत्रकार परिषदेनंतर विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनीदेखील पत्रकार परिषद घेऊन ठाकरे गटाला प्रत्युत्तर दिले आहे.

आजची पत्रकार परिषद पाहून एका निकषावर आलोय, झोपलेल्या माणसाला उठवू शकतो, परंतु सोंग घेतलेल्यांना कसे उठवणार? यापुढे मी कुठलेही स्पष्टीकरण देणार नाही. राज्यातील जनता सूज्ञ आहे. जी वस्तूस्थिती आहे ती लोकांसमोर ठेवली आहे. सुप्रीम कोर्टाच्या निकषांचे पालन करूनच निकाल दिला आहे, असे नावेकर म्हणाले.

सर्वोच्च न्यायालय राजकीय पक्ष संविधान, विधिमंडळ बहुमत याचा विचार करून मूळ राजकीय पक्ष कोणाचा यांचे आदेश पालन करूनच निर्णय दिला. १९९८ घटना शिवसेनेची मान्य, पण २०१८ मान्य नाही, असे अध्यक्ष यांनी केले असे वारंवार ते सांगतात, मात्र निवडणूक आयोगाकडे काय सादर केले त्याच आधारावर मी भूमिका घेतली. निवडणूक आयोगाकडे शिवसेना घटनेत केलेले बदल नोंद ज्याचा संदर्भ मी घेतला, असे नार्वेकर यांनी म्हटले.

### संविधानिक पद, संस्थांचा अवमान

पत्रकार परिषदेत ते (ठाकरे गट) राज्यपालांना फालतू माणूस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाबद्दल अपशब्द वापरले, विधानसभा अध्यक्षांवरचे त्यांचे प्रेमही दिसले. निवडणूक आयोगाला चोर म्हणाले, हे सगळे दुर्दैवी आहे. कुठलाही आधार असो अथवा नसो संविधानिक संस्थांविषयी असे शब्दप्रयोग करणे लोकशाहीसाठी घातक आहे. सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष अशा कोणत्याही संविधानिक पदावर, संस्थेवर यांचा विश्वास नाही, असेही या वेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटले.

माझ्यासमोर युक्तिवाद कुठेही २०१३ घटनाबदल या विषयी दावे केले नाही. यांनी २०१८ सालचे पत्र दाखवले. २०१८मध्ये निवडीचा निकाल फक्त निवडणूक आयोगास कळवला आहे, पण शिवसेना घटनेत कोणताही बदल केल्याचे निवडणूक आयोगास त्यांनी कळवले नाही. फक्त पत्र दाखवतात, त्यात काय लिहिले हे का सांगत नाही? असा सवालही नार्वेकर यांनी उपस्थित केला.

झाकली मूठ सव्वालाख अशी स्थिती आहे, असे म्हणत नार्वेकर यांनी अनिल परब यांच्यावर टीका केली. परब यांनी पत्र दाखवले होते की शिवसेनेने घटना निवड बदल निवडणूक आयोगास कळवले आहे, पण नार्वेकर यांनी स्पष्ट सांगितले, ज्या वेळेस निवड जाहीर केली तेव्हा मी कार्यकर्ता म्हणून बैठकीत असेलही, पण संविधान बदल निवडणूक आयोगाकडे केला नाही.

पक्षीय घटना कागदावर लिहून कपाटात ठेवायची नसती. पार्टटाईम अध्यक्ष किंवा पार्टटाईम वकील हे काम करू शकत नाहीत. जे लोक आज संविधानाचे धडे वाचत होते. लोकशाहीची हत्या झालीय असे बोलत होते त्यांना संविधानाने निर्माण केलेल्या घटनात्मक संस्थांचा आदर नसेल, तर त्यांच्यावर बोलूच शकत नाही. संविधानाचा अवमान करण्याचा त्यांना अधिकार नाही. त्यांच्यावर काय कारवाई करायची हे जनताच ठरवेल, असा टोला नार्वेकर यांनी लगावला.







(छाया : योगेश पाटील)

### उरणच्या शेतकरी लढ्याचा ४०वा स्मृतिदिन

# लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांचे हुतात्म्यांना अभिवादन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील गौरवशाली आणि शौर्यशाली शेतकरी लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना मंगळवारी (दि.१६) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी धुतूम, चिर्ले, जासई येथील स्मारकात अभिवादन केले. स्थानिक भूमिपुत्रांचे योग्य पुनर्वसन आणि रोजगाराचे प्रश्न मार्गी लागणे हीच प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा. पाटील आणि हुतात्म्यांना खरी आदरांजली असेल, असे मत या वेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

शेतकरी व प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व. दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वात भूसंपादनाच्या विरोधात १६ व १७ जानेवारी १९८४ रोजी शेतकरी लढा झाला होता. या लढ्यात १६ जानेवारी रोजी दास्तान फाटा येथे झालेल्या पोलिसांच्या गोळीबारात रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतूम) व नामदेव शंकर घरत (चिर्ले) या दोन शेतकऱ्यांना हौतात्म्य आले; तर आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी १७ जानेवारी रोजी नवघर फाटा येथे झालेल्या गोळीबारात कमलाकर कृष्णा तांडेल व महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील या पिता-पुत्रांसह पागोटे येथील तीन शेतकरी हुतात्मा झाले. या आंदोलनात हजारो शेतकऱ्यांना कारावास झाला, लाठीमार सहन करावा लागला. याच आंदोलनातून देशातील शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीच्या बदल्यात विकसित जमीन देण्याचा कायदा झाला.



शेतकरी लढ्याला मंगळवारी ४० वर्षे पूर्ण झाली. या लढ्यात हौतात्म्य आलेल्या शेतकऱ्यांना दरवर्षी अभिवादन करण्यात येत असते. त्यानुसार यंदाही लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह सर्वपक्षीयांनी अभिवादन केले. या कार्यक्रमाला आमदार जयंत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, उद्योजक जे.एम.म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जेएनपीए विश्वस्त रवींद्र पाटील, दिनेश पाटील, माजी विश्वस्त भूषण पाटील, कामगार नेते सुरेश पाटील, भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, जासईचे सरपंच संतोष घरत, पागोटेचे सरपंच कुणाल पाटील, **(पान २ वर..)**

## निवडक

### दिल्लीत दाट धुक्यामुळे वाहतुकीवर परिणाम

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत थंडीचा कडाका जाणवत असून मोठ्या प्रमाणात धुके पडत आहे. त्याचा विमान आणि रेल्वेसेवेवर परिणाम झाला आहे. दिल्ली विमानतळावर दृश्यमानता अत्यंत कमी असल्याने ६५ विमाने रद्द करण्यात आली आहेत, तर १५८ विमानांची उड्डाणे उशिराने झाली. विमानतळावर अनेक विमाने लँडिंगनंतर धावपट्टीवरच उभी होती.

### राष्ट्रीय युवा महोत्सवाचा शानदार समारोप

**नाशिक :** गेल्या पाच दिवसांपासून नशिकमध्ये सुरू असलेल्या २७व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या समारोपाचा मंगळवारी (दि. १६) सोहळा महा युवाग्राम हनुमान नगर येथे झाला. राज्य क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे व पालकमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली समारोपाचा कार्यक्रम पार पडला. महोत्सवामध्ये देशभरातून आलेल्या युवकांनी कलात्मक प्रतिभेचा अनुभव दिला.

# नमो चषक क्रिकेट स्पर्धेला कळंबोलीत प्रारंभ

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन; स्पर्धकांना शुभेच्छा



(छाया : संकेत भोईर) अधिक छाया पान ८ वर..

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा आयोजित नमो चषक महोत्सव अंतर्गत कळंबोली येथे भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा सुरू झाली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.१५) झाले. या वेळी रायगड विरुद्ध ठाणे संघांत झालेली लढत क्रिकेटप्रेमींचे आकर्षण ठरली.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा होत आहे. त्या अंतर्गत १५ ते २५ जानेवारीदरम्यान कळंबोली येथील केएलई कॉलेजच्या मैदानात भव्य टेनिस क्रिकेट दिवस रात्र स्पर्धेचे आयोजन माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, विकास घरत, युवा नेते हॅप्पी सिंग, रामा महानवर, संदीप म्हात्रे, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रशांत खानावकर यांच्या माध्यमातून केले गेले आहे.


स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, राजेंद्र शर्मा, विकास घरत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, उत्तर जिल्हा ओबीसी मोर्चा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, **(पान २ वर..)**

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर ३१ जानेवारीपर्यंत निकाल?

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवरील निकाल लागल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या याचिकेकडे सगळ्यांचे लक्ष आहे. २५ जानेवारीपर्यंत दोन्ही गटांच्या बाजू ऐकून घेतल्यानंतर विधानसभा अध्यक्ष ३१ जानेवारीपर्यंत निर्णय देण्याची शक्यता आहे.

वरिष्ठ नेते अजित पवार यांनी उठाव केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले आहेत. दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात याचिका दाखल केल्या आहेत. राष्ट्रवादीच्या प्रकरणात एकूण पाच याचिका आहेत. त्या याचिका दोन गटात विभाजित केल्या जाणार आहेत. दरम्यान, दोन्ही गटांतील सदस्यांना फेरसाक्ष देण्यासाठी २० जानेवारीपासून बोलावण्यात येणार आहे.



पुन्हा उपमुख्यमंत्री बनलेल्या अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाने प्रतिज्ञापत्रात सुमारे ४० आमदार-खासदारांचा पाठिंबा असल्याचे म्हटले आहे. पक्षाचे अधिक लोकप्रतिनिधी आमच्या बाजूने असल्याने त्यांनी पक्षावर दावा ठोकला आहे.

शिवसेनेशी संबंधित सत्तासंघर्षाच्या प्रकरणावर नुकताच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसबाबतही लोकसभा निवडणुकीपूर्वी निर्णय होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अयोध्येत १०८ फूट लांब अगरबत्ती प्रज्वलित

## रामजन्मभूमीत सोहळ्याला सुरुवात



**अयोध्या : वृत्तसंस्था**

अयोध्येसह देशात सध्या उत्साहाचे वातावरण आहे. २२ जानेवारीला भव्य राम मंदिरात रामलल्ला प्राणप्रतिष्ठा होणार आहे. या पार्श्वभूमीवर १०८ फूट लांब अगरबत्ती मंगळवारी (दि.१६) श्री रामभूमी तीर्थक्षेत्राचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास महाराज यांच्या उपस्थितीत जय श्री रामच्या जयघोषात प्रज्वलित करण्यात आली.

रामलल्ला प्रतिष्ठापना कार्यक्रमाला सुरुवात झाली असून तो २२ जानेवारीपर्यंत चालणार आहे. यामध्ये अनेक विधी, यज्ञ केले जाणार आहेत. श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी देशाच्या कानाकोपऱ्यातून रामभक्त आणि अनेक प्रकारच्या भेटवस्तू अयोध्येत पोहचत आहेत. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी भव्य अगरबत्तीची खूप चर्चा रंगली आहे.

राम मंदिरासाठी खास अगरबत्ती तयार करण्यात आली असून ती सुमारे दीड महिने प्रज्वलित राहील असे सांगण्यात येत आहे. ही अगरबत्ती गुजरातच्या वडोदरामध्ये तयार करण्यात आली आहे. या अगरबत्तीची लांबी १०८ फूट आणि वजन ३५०० किलो आहे. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला सुरुवात होताच ही भव्य अगरबत्ती प्रज्वलित करण्यात आली.

### अशी आहेत वैशिष्ट्ये

गुजरातच्या वडोदरा येथे बनवलेल्या भव्य अगरबत्तीची लांबी १०८ फूट, रुंदी ३.५ फूट आणि वजन साडेतीन टन आहे. १४७० किलो शेण, ४२० किलो जडीबुटी, ३७६ किलो गुग्गुलू, ३७६ किलो नारळाच्या शेंड्या आणि १९० किलो तूप मिसळून ही अगरबत्ती तयार करण्यात आली आहे. तिचा सुगंध अनेक किलोमीटरपर्यंत पसरला आहे. विशेष म्हणजे ही अगरबत्ती पर्यावरणपूरकरित्या तयार करण्यात आली आहे. ती दीड महिना जळत राहणार असल्याचे सांगितले जात आहे.

### भीषण अपघातात सहा जण ठार

**यवतमाळ : प्रतिनिधी**

पुसद-दिग्रस मार्गावरील बेलगव्हान घाटात नाल्याच्या पुलावरून ॲपे वाहन कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात सहा जण ठार झाले, तर ११ जण जखमी झाले. जखमींपैकी पाच जणांची प्रकृती गंभीर आहे. हा अपघात मंगळवारी (दि. १६) दुपारी १२ वाजताच्या सुमारास झाला.

अपघातग्रस्त पुसद तालुक्यातील मोहा तांडा, गोकी तांडा व पांढुर्णा गावातील आहेत. ते ॲपे वाहनातून बकरा घेऊन वाशीम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे नवस फेडायला जात होते. बेलगव्हान घाटात वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडी पुलावरून खाली कोसळली. जखमींना पुसद ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## पनवेल मनपा क्षेत्रात स्वच्छ तीर्थ अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार स्वच्छ तीर्थ अभियान पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यास सुरुवात झाली असून या अभियानांतर्गत चारही प्रभागातील मंदिरे, मंदिराच्या आजूबाजूचा परिसर, रस्ते, चौक, गार्डन या ठिकाणची स्वच्छता करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रविवारी पहिल्या दिवशी २४ मंदिरांची व सोमवारी ३० मंदिरांची स्वच्छता करण्यात आली.

मंदिरांची स्वच्छता करण्याच्या हेतूने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ तीर्थ अभियानाची घोषणा केली आहे. त्यानुसार पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील अभियानांतर्गत सर्व मंदिर व परिसराची स्वच्छता त्याचबरोबर रस्ते, चौक, गार्डन यांची



स्वच्छता, रस्त्यावरील डेब्रिज हटवणे, रस्त्यावरील अतिक्रमण हटविणे, चौक सुशोभित करण्यात येणार आहे.

याबाबतची सविस्तर माहिती देण्याकरिता मुख्यालयातील बैठक सभागृहात आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनखाली चारही प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांची बैठक सोमवारी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपायुक्त सचिन पवार, डॉ. वैभव विधाते, अभियंता अनिल कोकरे, चारही प्रभाग अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. या अभियानांमध्ये विविध एनजीओ, विविध सामाजिक संघटना, गृहनिर्माण सोसायट्या, नागरिकांनीही सहभाग घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे. **(पान २ वर..)**

# झुरीकमध्ये मुख्यमंत्री शिंदेंचे मराठी बांधवांकडून स्वागत

**दावोस : वृत्तसंस्था**

वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमची २०२४ची गुंतवणूक परिषद स्वित्झर्लंडच्या दावोस येथे सुरू झाली आहे. या परिषदेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दाखल झाले असता स्वित्झर्लंडमधील भारतीयांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत केले.

भारतीयांच्या विशेषतः या मराठी भाषिकांनी झुरीक येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमास येण्याचे मान्य केल्याबद्दल या सर्व मराठी बांधवांनी विशेष आनंदही व्यक्त केला आहे. यानिमित्त स्वित्झर्लंडमध्ये नोकरी, व्यवसायानिमित्त स्थायिक झालेल्या मराठीजनांनी मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्याबाबत स्वागताच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. या परिषदेच्या यशासाठीही शुभेच्छा दिल्या आहेत.

बृहन्महाराष्ट्र स्वित्झर्लंडचे (जीनिव्हा) अध्यक्ष अमोल सावरकर म्हणाले, मुख्यमंत्री शिंदे हे एका महत्त्वाच्या



गुंतवणूक परिषदेसाठी इथे येत आहेत. इतक्या व्यस्त कार्यक्रमातूनही त्यांनी मराठी जनसमुदायाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकारले, हे विशेष. म्हणूनच आम्हाला आनंद झाला आहे. त्यांच्या सर्व उपक्रमांना आम्ही शुभेच्छा देत आहोत. महेश बिराजदार (मूळचे लातूर) यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे नेतृत्व आम्हा मराठी जनांसाठी खूप प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांचे स्वागत करताना त्यांना शुभेच्छा देताना खूप खूप आनंद होत आहे, असे सांगितले.

किर्तीमालिनी गद्रे (पदाधिकारी महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंड), यांनी मी मूळची ठाण्याची आहे. त्यामुळे आमच्या ठाण्यातील शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून येथे येत आहेत याचा सर्वात मोठा आनंद आहे. त्यांच्या स्वागतासाठी आम्ही महाराष्ट्र मंडळातर्फे मोठी तयारी केली आहे. त्यांचे स्वागत करण्याची संधी मिळाली आहे, याचाही खूप मोठा आनंद आहे, असे म्हटले. शेखर काकडे यांची पत्नी विद्या, कन्या बिल्वा काकडे (झुरीक) यांनीही मुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत केले आहे. त्यांनी म्हटले की, आम्ही झुरीकमध्ये गेली दहा वर्षे राहत आहोत. मुख्यमंत्री शिंदे स्वित्झर्लंड दौऱ्यासाठी येत आहेत. याचा खूप मोठा आनंद आहे.

स्वित्झर्लंडमधील तमाम महाराष्ट्रीयन बांधवांच्या वतीने आम्ही त्यांचे स्वागत करतो आणि त्यांच्या या दौऱ्यालाही शुभेच्छा देतो. प्रभूद्य यत्नाळकर हे मुळचे पुण्याचे आहेत. ते झुरीकमध्ये राहतात. त्यांनीही मुख्यमंत्री शिंदे यांच्या या दौऱ्यासाठी स्वागत केले आहे. मंजिरी यत्नाळकर यांनीही मुख्यमंत्र्यांचे झुरीकमध्ये स्वागत करताना खूप आनंद झाल्याचे म्हटले आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यालाही शुभेच्छा दिल्या आहेत.

# भाजप प्रदेश कार्यालयात श्रीराम दर्शन रथाचे जल्लोषात स्वागत

**मुंबई : प्रतिनिधी**

अयोध्येतील राम मंदिराची प्रतिकृती असलेल्या श्रीराम दर्शन रथाचे भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात मंगळवारी 'जय श्रीराम' घोषणांच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.

प्रदेश प्रवक्त्या श्वेता शालिनी, प्रवक्ते अतुल शाह, विनोद वाघ, ओमप्रकाश चौहान, देवांग दवे, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते. अयोध्येच्या राम मंदिरात प्रभू रामचंद्रांच्या भव्यदिव्य प्रतिष्ठापना सोहळ्याचे विधी मंगळवारपासून सुरू झाले आहेत. सर्वांनाच प्रत्यक्ष जाऊन प्रभू रामचंद्रांचे दर्शन घेणे आणि मंदिर पाहता येणे शक्य नाही हे लक्षात घेऊन अयोध्येतील राम मंदिर कसे आहे हे पाहता यावे यासाठी श्वेता शालिनी यांच्या संकल्पनेतून हा श्रीराम दर्शन रथ साकारला आहे.

अयोध्येहून आलेल्या कारागीरांनी या रथावर मंदिराची प्रतिकृती उभारली असून प्रभू श्रीरामाची सुंदर मूर्ती ठेवण्यात आली आहे. हा दर्शन रथ महानगरामधील गृहसंकुलांमध्ये जाणार आहे.

रथावरील राम मंदिराच्या प्रतिकृतीच्या माध्यमातून अयोध्या येथे येत्या २२ तारखेला लोकार्पण होणाऱ्या मंदिराची माहिती व अयोध्या येथील श्रीरामाच्या दरबाराचे दर्शन घेता येणार आहे.



# मुंबई ते पंढरपूर पालखीचे पनवेलमध्ये स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रतिवर्षीप्रमाणे श्री वारकरी प्रबोधन महासमिती महाराष्ट्र यांच्यातर्फे श्री पांडुरंग पालखी सोहळा श्री राममंदिर कॉटनग्रीन ते विठ्ठल मंदिर वडाळा यानंतर पंढरपूरपर्यंत असते. पालखीचे रविवारी (दि. ७) आयोजन करण्यात आले होत.

या वेळी संताजी जगनाडे महाराज महासंघ मुंबई यांच्या वतीने संताजी जगनाडे महाराज चौक लालबाग येथे सकाळी पालखीला सुरुवात होते. ही पालखी पनवेलला आली तेव्हा पालखीचे स्वागत करण्यात आले.

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा कोकण विभाग अध्यक्ष सतिश वैरागी व अखिल तेली समाज सेवा संस्था चेंबूरचे अध्यक्ष प्रफुल खानविलकर यांच्या हस्ते लालबाग येथील संत श्री जगनाडे महाराज यांच्या चौकाला पुष्पहार घालण्यात आले. त्यानंतर शाब्दिक सुमनाने सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या सोहळ्यात २५० ते ३०० समाज बांधवांनी सहभाग घेतला होता.

मधुकर नेराळे, राजेंद्र कोरडे , ॲड. रघुनाथ महाले, अनिला चौधरी ताई, संजय नगरे साहेब, संदीप तेली साहेब, विलास घोंगते आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी दिलीप खोंड यांनी परिश्रम घेतले.



# डीपेक्स पोस्टरचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

आयटीआय, डिप्लोमा व अभियांत्रिकी या क्षेत्रात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी गेली ३२ वर्ष सुरू असलेला डीपेक्स हा कार्यक्रम यंदा नवी मुंबईत होणार असून डीपेक्स २०२४च्या पोस्टरचे अनावरण राज्याचे कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांचे हस्ते करण्यात आले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांनी बनवलेल्या प्रोजेक्टचे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करीत असते. महाराष्ट्र व गोवा राज्यातून या प्रदर्शनासाठी नामांकन मागवली जातात व त्यापैकी उत्कृष्ट ३०० प्रोजेक्टस्ना या प्रदर्शनात सादरीकरण करण्याची संधी मिळते. यामधील सर्वोत्कृष्ट प्रोजेक्ट्सना पारितोषिक दिले जाते. या वर्षी ७ ते १० मार्च रोजी



नवी मुंबईत डीपेक्स हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून गेल्या अनेक वर्षाची उत्कृष्ट वाटचाल आणि अनेक उद्योजक निर्मितीला लावलेला हातभार पाहून यंदा महाराष्ट्र शासनाचा कौशल्य विकास विभागदेखील या कार्यक्रमाचा सहआयोजक बनणार असल्याची घोषणा कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पोस्टर अनावरण कार्यक्रमाच्या वेळी केली.

या कार्यक्रमास माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, माजी आमदार संदीप नाईक, नवी मुंबई सिटीझन फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश निकम, अभाविपचे प्रदेशमंत्री संकल्प फळदेसाई, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य अमित ढोमसे, तंत्रशिक्षण विद्यार्थी कार्यप्रमुख श्रेया कणसे, नवी मुंबई जिल्हा प्रमुख नीळकंठ बिजलगावकर, वाशी नगर अध्यक्ष प्रा. बासूकिनाथ पांडे उपस्थित होते.

# घरपट्टी, पाणीपट्टी भरण्याचे मुरूड नगर परिषदेचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड नगर परिषदेकडून नागरिकांनी घरपट्टी व पाणीपट्टी भरण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. शहरातील केवळ ४८ टक्के नागरिकांनी घरपट्टी भरली आहे. यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

मुरूड शहराची लोकसंख्या १२ हजारच्या आसपास असून येथे घरपट्टी व पाणीपट्टी भरण्याचे सरासरी वार्षिक आकडा ९० टक्केच्या आसपास आहे. नागरिक उत्तम सहकार्य करणारे असून आपले देयके भरण्यात त्यांचा नेहमीच प्रामाणिकपणा दिसून येत आहे. सध्या नगर परिषदेने वसुली मोठ्या प्रमाणात होण्यासाठी जनजगृतीबरोबरच कर्मचारी स्वतः थकबाकीदारांच्या घरी जाऊन लोकांना घरपट्टी व पाणीपट्टी भरण्यासाठी आवाहन करीत आहेत.

# उरण वाहतूक पोलीस जागरूकता कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय येथे नवी मुंबई आयुक्तालय, उरण वाहतूक पोलिसांतर्फे मंगळवार (दि. १६) जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी वाहतूक सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय पवार, असिस्टंट मॅनेजर नीरज मेहेत्रे, सीएफएस सेफ्टी ऑफिसर जे. एम. बक्षी, पोलीस नाईक उरण निलेश मोरे यांची उपस्थिती लाभली.

शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. शाळेतील इयत्ता नववी व १०वीतील विद्यार्थ्यांना रस्ता वाहतूक नियम, कायदे, सुरक्षा या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.



दुचाकी, चारचाकी वाहने, लायसन्सचे महत्त्व, गाडी चालवताना पालन करावयाचे नियम याबद्दल जागरूक नागरिक कसा असावा याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कविता मॅडम यांनी केले.

# कोलाड हायस्कूल येथे शिक्षक प्रशिक्षण सुरू

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाच्या अंतर्गत इ. सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रशिक्षणाची सुरुवात रोहा तालुक्यातील कोलाड हायस्कूल येथे मंगळवारी (दि. १६) झाली.

या वेळी या प्रशिक्षणासाठी रोहा गट शिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, धाटाव केंद्रप्रमुख नारायण गायकर, पिंगळसई केंद्रप्रमुख रश्मी काळे व इतर मार्गदर्शक उपस्थित होते.



गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांनी, कोविडनंतर प्रथमच आपल्यासाठी शासनाच्या शिक्षण विभागातर्फे ऑफलाईन पद्धतीने प्रशिक्षण आयोजित केले आहे. आज या प्रशिक्षणातील अंतिम म्हणजे चौथा टप्पा सुरू होत आहे. या पाच दिवसीय प्रशिक्षणाचा सर्व अध्यापकांनी लाभ घ्यावा, तसेच हे प्रशिक्षण आपल्यास आनंददायक, नावीन्यपूर्ण, प्रेरणादायी वाटेल व त्याचा उपयोग आपल्या शाळेत अध्यापनात वापर करावा, असे मार्गदर्शन केले. प्रशिक्षणासाठी रोहा तालुक्यातील १००हून अधिक शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते.


# कर्जतमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या ४६ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या कर्जत तालुका परिसराच्या अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. २२ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात किर्तन प्रवाचनांद्वारे ज्ञानदान होणार असून एक कोटी 'जय जय राम कृष्ण हरी' हा नामजप करण्याचा संकल्प आहे. दररोज गीता पठण, ज्ञानेश्वरी पारायण, भजने करण्यात येत आहेत.

कर्जत मधील पोलीस ठाण्याच्या माऊली मैदानावर अखंड हरिनाम सप्ताहाचे समितीचे अध्यक्ष हभप नथुराम हरपुडे यांच्या मार्गदरशनाखाली आयोजन कारण्यात आले आहे. पहाटेपासूनच कर्जत शहरातील विविध धर्मियांच्या मंदिरे व प्रार्थनास्थळांमध्ये जाऊन पूजन करण्यात आले. त्यानंतर मिरवणुकीने संत ज्ञानेश्वर व श्रीकृष्णाची मूर्ती पोलीस मैदानापर्यंत आणण्यात आली. त्यानंतर प्रवेशद्वार पूजन करण्यात आले. गणेश पूजन रामभाऊ व सीताबाई वाघमारे, श्री ज्ञानेश्वर माऊलींचे पूजन संतोष व सुजाता वैद्य, दीपप्रज्वलन नगरसेवक बळवंत घुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. कलशपूजन संभाजी व सुरेखा देशमुख, मंडपपूजन मिलिंद तिवाटणे, गीता ग्रंथ पूजन शिवाजी व सुप्रिया भासे, पारायणाचार्य पूजन मुकेश व मनिषा सुर्वे, वीणा- टाळ- पखवाज पूजन हभप दिलीप महाराज राणे, ध्वजारोहण विजय मांडे यांच्या हस्ते, व्यासपीठ पूजन सुदाम व कुमिदिनी कार्ले यांच्या हस्ते करण्यात आले.

पौराहित्य नरेंद्र जोशी यांनी केले. संतोष वैद्य, बिनिता घुमरे, कल्लू गुप्ता, पांडुरंग गरवारे, दीपक लाड, रोहिणी सुर्वे, वासुदेव इंगळे, माणिक हरपुडे, मीना प्रभावळकर आदी उपस्थित होते.



## पान १ वरुन

### लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांचे हुतात्म्यांना अभिवादन

पागोटे अध्यक्ष प्रकाश भोईर, माजी नगरसेवक राजू ठाकूर, विभागीय अध्यक्ष गोपी म्हात्रे, नीलकंठ घरत, शिवाजी भगत, सुधीर घरत, ॲड. जे.डी. तांडेल, नंदकुमार पटवर्धन, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, विनोद म्हात्रे, कामगार नेते जितेंद्र घरत यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, चिर्ले येथे हुतात्मा नामदेव शंकर घरत स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्याचप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शेमटीखार श्रमिक कल्याणकारी सामाजिक संस्थेच्या वतीने धुतूम गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूलबॅगचे वाटप करण्यात आले; तर हुतात्मा रघुनाथ अर्जुन ठाकूर यांच्या कुटुंबियांच्या वतीनेही या शाळेत स्मृतीदिनानिमित्त खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी रेश्मा ठाकूर, विनोद ठाकूर, मेघनाथ ठाकूर, राजेश ठाकूर उपस्थित होते.

### नमो चषक क्रिकेट स्पर्धेला कळंबोलीत प्रारंभ

भटके विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, चिटणीस संदीप म्हात्रे, कळंबोली मंडळ उपाध्यक्ष संदीप भगत, सुनील ढेबरे, सरचिटणीस दिलीप बिस्ट, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, प्रकाश महानवर, भाजप नेते देविदास खेडकर, हनुमंत शेळके, आभा घुटूकडे, संदीप भगत, विनोद बोरसे, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, सरचिटणीस निशांत गिल, अमर ठाकूर, जमीर शेख, महादेव येरवले, घनश्याम शर्मा, विष्णू गायकवाड, शुभांगी निर्मले, वनिता येरकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पनवेल मनपा क्षेत्रात स्वच्छ तीर्थ अभियान

या वेळी उपायुक्त सचिन पवार यांनी स्वच्छ तीर्थ अभियानांतर्गत डिप क्लिन ड्राईव्ह घेण्याबाबत सर्व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. १५ दिवस हे अभियान राबविण्यात येणार असून प्रत्येक प्रभागामध्ये यासाठी 'सुपर १५०' कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक या अभियानांतर्गत प्रत्येक प्रभागातील मंदिरे, मंदिराच्या आजूबाजूचा परिसर, रस्ते, चौक, गार्डन या ठिकाणची स्वच्छता करीत आहेत.

# जीडीटी फ्युचर स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



**रोहे : प्रतिनिधी**

तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट अंतर्गत कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळाची सुडकोळी चणेरा येथील जीडीटी फ्युचर स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे स्नेहसंमेलन शनिवारी (दि.१३) आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची संकल्पना व्हायब्रंट असून देशातील विविधता दर्शवत प्रत्येक राज्याचे नृत्य सादर करण्यात आले. शाळेत शिकत असलेले स्वयंसरंक्षण अंतर्गत लाठीकाठीचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी आपल्या नाटिकेतून केले.

प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष संदीप तटकरे व त्यांच्या पत्नी ऋतुजा तटकरे लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. मुख्याध्यापिका नुरीना शिंगरे यांनी वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाला तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे रजिस्टर अजित तेलंगे, एमडीएम स्कूल आणि जीडीटी स्कूलचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर, डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी कॉलेजचे प्रा. डॉ. विश्वास देशमुख, एमडीएन फ्युचर स्कूलच्या मुख्याध्यापिका योगिनी देशमुख, गीता द. तटकरेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी केसरकर व युनिट्सचे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# नवरा माझ्या मुठीत गं विनोदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**खोपोली : प्रतिनिधी**

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुभाष कटकदौंड लिखीत नवरा माझ्या मुठीत गं हा विनोदी काव्यसंग्रह आणि माणुसकी हिच खरी जात ही एकांकिका अशा दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा खोपोली बुज हास्य परिवाराचे संस्थापक बाबुभाई ओसवाल यांच्या हस्ते मकरसंक्रांतीच्या दिवशी लोहाणा समाज हॉल, खोपोली येथे झाला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक बुज हास्य परिवाराचे प्रभारी अध्यक्ष, विजय घोसाळकर यांनी केले. कार्यक्रमात अध्यक्ष कोमसाप खोपोली उज्वला दिघे आणि ज्येष्ठ कवी, अध्यक्ष ब्राम्हण सभा, अनिलकुमार रानडे हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा धायगुडे यांनी तर आभार जनार्दन सताणे यांनी मानले. कार्यक्रमासाठी संतोष वाघ, सावित्रीबाई जाधव, पंकज दुर्गे, दिपक मालुसरे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# चिरनेर गावात चोरांची टोळी सक्रिय

## अनेक ठिकाणी घरफोडी; नागरिक भयभीत

**उरण : रामप्रहर वृत्त**

गेले कित्येक दिवस चिरनेर गावात व परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून अंधाराचा फायदा घेत पाच ते सहा चोरांच्या टोळीने चिरनेर गावातील अनेक घरांमध्ये चोऱ्या करून आपली दहशत निर्माण केली आहे. याबाबत नागरिकांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी दाखल करूनही चोरांचा बंदोबस्त झाला नाही.

चिरनेर हे उरण तालुक्यातील ऐतिहासिक गाव आहे. सुमारे आठ हजार लोकसंख्या असणाऱ्या या गावात अठरा पगड जातींच्या लोकांचे वास्तव्य आहे, मात्र काही दिवसांपासून चिरनेर गावात चोरांची एक टोळी सक्रिय झाली असून त्यांनी अनेक बंद घरांमध्ये सोने व पैशांच्या चोऱ्या केल्या आहेत. याबाबत चोरी झालेल्या नागरिकांनी उरण पोलीस ठाण्यात याबाबत तक्रारीही दाखल केल्या आहेत.



कोणतीही उपाययोजना न केल्याने या सराईत चोरांनी गावात कोणालाही न घाबरता आपले चोरीचे सत्र सुरू ठेवले असून नुकतेच एका मध्यरात्री प्रमोद कमळाकर ठाकूर यांच्या बंगल्यात चोरीच्या उद्देशाने प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, मात्र घरात असलेल्या त्यांच्या सुरक्षा रक्षकाने आरडाओरड करताच हे चोर पळून गेले. जाताना त्यांनी बंगल्याच्या काचा फोडल्या

या चोरांकडे धारदार शस्त्रे असून तोंडाला रुमाल बांधून हे चोर घरात प्रवेश करतात. पोलीस यंत्रणेच्या उदासीन धोरणामुळे या चोरांपासून जनतेच्या जीवितास धोका निर्माण झाला असून एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यावर पोलीस या चोरांचा तपास करतील का, असा सवाल विचारला जात आहे.

**चोरांची दहशत ही चिंताजनक बाब असून पोलीस यंत्रणेने यासाठी कठोर उपाययोजना करणेचे गरजेचे आहे. वेळ पडल्यास गावातील तरुणांना सोबत घेऊन चोरांच्या बंदोबस्तासाठी गस्ती पथके निर्माण करावीत.**
**-जयेश खारपाटील, भाजप कार्यकर्ते**

**सरपंचांशी पत्रव्यवहार करून सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली आहे. पोलिसांची गस्त वाढविली आहे. एक अधिकारी, चार पोलीस तैनात केलेत. संशयित वाहनांची पाहणी करण्यास सांगितलेय. लवकरच चोरांचा बंदोबस्त होईल.**
**-सतीश निकम, वपोनि, उरण**

# नमो चषक चित्रकला स्पर्धेत ७० हजार स्पर्धकांची नोंदणी

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील उद्योन्मुख कलाकारांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नमो चषकचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार नमो चषक चित्रकला स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निडवणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १६) उद्घाटन झाले. या स्पर्धेत ७० हजार स्पर्धकांनी नोंदणी केली आहे.



महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा घेण्यात येत असून पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर मंडलात चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. त्यानुसार या स्पर्धेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लीक स्कूलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अनिवाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, गोपीनाथ भगत, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, भाऊ भगत, काकासाहेब कुत्तरवडे, नारायण पोपेटा, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव, आदित्य भगत, वर्षा शेलार, महिला मोर्चा अध्यक्षा वनिता पाटील, सोनाली खरटमोल, दुर्गा बन्सल, सारीका पाचपुते, साधना आचार्य आदी उपस्थित होते.

या स्पर्धेचे भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आणि मुख्याध्यापीका स्वप्नाली म्हात्रे यांनी संयोजन केले आहे.

## निवडक

### लग्नाचे आमिष दाखवून उकळले पैसे

**पनवेल :** लग्नाचे आमिष दाखवून एका महिलेची फसवणूक करून तिच्या साडेसात लाख रुपये रोख व डेल कंपनीचा लॅपटॉप घेऊन एक व्यक्ती पसार झाल्याची घटना घडली आहे. आरोपीने तक्रारदार महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन करून तिच्याकडून साडेसात लाख रुपये व एक लॅपटॉप घेवून तो पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### नवीन पनवेलमध्ये घरफोडी

**पनवेल :** नवीन पनवेल अग्निशमन कॉलनीत चोरी झाल्याची घटना घडली आहे झाली असून, चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून दागिने पळवून नेले. चोरी करण्यापूर्वी शेजारील सर्व घराला बाहेरून कडी लावण्यात आली होती. अग्निशमन दलाच्या इमारतीत राहणारे फायरमन जितेंद्र पाटील यांच्या घराचा दरवाजा चोरट्यांनी तोडण्याचा प्रयत्न केला. आवाजामुळे जागे झालेल्या पाटील यांनी बाहेर येऊन पाहताच चोरट्याने तेथून पळ काढला. इमारतीमध्ये बाहेरून दरवाजाला कडी लावली होती. तळमजल्यावरील राजेंद्र फरांदे हे कामानिमित्त गावी सातारा येथे गेले असून त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडल्याचे दिसले. चोरट्यांनी सोन्याचे मंगळसूत्र, फुलांची जोडी आणि १८ हजार रुपये असा ७० हजार रुपयांचा ऐवज चोरला आहे.

### तुराडे येथे अक्षता कलश यात्रा



**मोहोपाडा :** तुराडे गावातील धीरज भोईर यांचा सहकार्याने नागरिकांनी अयोध्याहून आलेल्या कलश यात्रेचे जोरदार स्वागत केले. या वेळी घरोघरी महिलांनी कलशाला औक्षण करुन आशिर्वाद घेतले. या कलश यात्रेत नाचता घोडा आकर्षण ठरला. तुराडे गावातील रस्ते साफ करून रस्त्याच्या दोन्ही बाजूला आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. तुराडे गाव श्री राम जयघोषाने दणाणून निघाला. या कलश यात्रेत तुराडे ग्रामस्थ बजरंग दल रसायनी प्रखंड यांसह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विविध क्षेत्रातील व्यक्तींचा सत्कार

**पनवेल :** भाजप महासचिव विक्रांत पाटील यांच्या कडून विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. वडाळे तलाव येथे सरोज जीतेकर यांचा गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल व निता मंजुळे यांची भाजप महिला मोर्चा पनवेल कार्यकारिणीमध्ये निवड झाल्याबद्दल व नवनिर्वाचित सरपंच गोसावी यांचा सत्कार भाजप महासचिव विक्रांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील तसेच कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



### रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन

**पनवेल :** शहर वाहतूक शाखेतर्फे रस्ता सुरक्षा अभियान २०२४चे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन करण्यात आले. पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे रस्ता सुरक्षा अभियान २०२४चे पळस्पे फाटा येथे उदघाटन करण्यात आले. या वेळी जड अवजड वाहनाचे ४०-५० चालक तसेच स्थानिक नागरिक व वाहन चालक असे उपस्थित होते. या वेळी वाहनचालक व नागरिकांना रस्ता सुरक्षा अभियान २०२४चे अनुषंगाने जनजागृती करण्यात आली असून त्यांना वाहतुकीचे नियमाचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.





**पनवेल : खेरणे येथील श्री मुंजेश्वर सामाजिक आणि सांस्कृतिक मंडळाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त गावात दिंडी यात्रा काढण्यात आली. यात महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही सहभाग घेतला. या वेळी माजी सरपंच बुधाजी माळी, जि.प. शाळेचे अध्यक्ष प्रदीप माळी, सरपंच शैलेश माळी, उपसरपंच राजेंद्र गोंधळी, सदस्य अशोक गोंधळी, संतोश गोंधळी, राजेश माळी, नरेश गोंधळी, मधुकर गोंधळी, कोंडीराम पाटील, बाळाराम माळी, अरविंद गोंधळी, ज्ञानदेव गोंधळी, रामा माळी, विलास गोंधळी, महेंद्र गोंधळी आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)



**कामोठे : येथे संत वामनभाऊ भगवानबाबा सेवा मंडळाच्या वतीने येत्या २२ जानेवारीपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह सेक्टर ८ येथील गणेश मैदानात होणार आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी अधिकाऱ्यांसह या मैदानाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, काकासाहेब कुत्तरवडे, भाऊ भगत, प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे यांच्यासह मंडळातील सदस्य उपस्थित होते.**




**तळोजा : भाजपच्या वतीने मकरसंक्रांतीनिमित्त पतंग स्पर्धा सोमवारी फेस २ येथील श्री छत्रपती संभाजी महाराज मैदानात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले तसेच या पतंग स्पर्धेला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ही भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, पापा पटेल, बबन मुकादम, रविकांत म्हात्रे, गुरूनाथ मुंबईकर, कैलास घरत, दिनेश केणी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप पुरस्कृत वंदे मातरम जनरल कामगार संघटना रायगडच्या सहा आसनी इको-टॅक्सी शेअरिंग चालक-मालक संघटनेच्या वतीने सोमवारी आयटीआय नाका येथे श्री सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांची प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लाभली तसेच गणेश भोईर, ज्ञानेश्वर पाटील, नामदेव पाटील, दत्ता करणेकर, प्रकाश चोरघे, बाळा भगत, सूरज पवार, श्रीकांत म्हात्रे, रोहिदास पवार, गणपत मुकादम, जनार्दन मते, अनिल पाटील, आकाश फडके, ओबीसी सेलच्या कविता पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने न्हावे येथे दफनभूमीसाठी रोडचे काम करण्यात येणार आहे. या कामाचा शुभारंभ नुकताच झाला. या वेळी सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच किसन पाटील, ग्रामपंचायत सदस्य शैलेश पाटील, मीनाक्षी पाटील, रंजना पाटील, किशोर घरत, जॉर्ज मिनिझेस, भूषण पाटील, हमीद काझी, निसार काझी, अबू काझी, कमलाबाई म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रिल्स मेकिंग कॉम्पिटिशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. १६) सकाळी ११ वाजता वाणिज्य विभागातर्फे स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आंतरमहाविद्यालयीन रिल्स मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेसाठी नवी मुंबईमधील वेगवेगळ्या महाविद्यालयातील तसेच रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या स्पर्धेमध्ये उस्फूर्त असा सहभाग घेतला तसेच या स्पर्धेचा निकाल ही जाहीर करण्यात आला त्यामध्ये वंश पाटील याने (रामशेठ ठाकूर महाविद्यालय) प्रथम क्रमांक पटकाविला तसेच प्रदीप बोहरा (रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर) याने द्वितीय क्रमांक पटकाविला तसेच नसीर शेख (रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला या सर्व विजेत्यांना महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून त्यांच्या हस्ते त्यांना रोख रकमेची बक्षिसे व प्रमाणपत्र दिली तसेच सर्व स्पर्धकांचे व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. सूर्यकांत परकाळे चांगू काना ठाकूर महाविद्यालय पनवेल यांनी उपस्थित राहून काम पाहिले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ महादेव चव्हाण, प्रा. नम्रता पारीक, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. राहुल कांबळे, प्रा. मनोज यादव, प्रा. प्रमोद वाघे तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# 'एपीपीएल लर्निंग'च्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे एपीपीएल लर्निंग सेंटरच्या सात विद्यार्थ्यांनी २१व्या पामा ग्लोबल अबॅकस अँड मेंटल अरिथमॅटिक इंटरनॅशनल स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून, विजेत्यांमधील एपीपीएल सेंटरचे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

यंदा ही स्पर्धा भारतात झाली. डिसेंबर महिन्याच्या अखेरीस सिडको, नवी मुंबई येथे झालेल्या या स्पर्धेत १७ देशांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत एपीपीएल लर्निंग सेंटर करंजाडेच्या विद्यार्थ्यांची कामगिरी विशेष राहिली आहे.

विजेत्यांमधील एपीपीएल लर्निंग सेंटरचे विद्यार्थी अनवेशा राजशिर्के (पहिली रनरअप), स्वरांगी धाके (दुसरी रनर अप), भार्गवी घुगरे (दुसरी रनर अप), भुमी दिंडे (दुसरी रनर अप), रिधीमा सरोठीया (दुसरी रनर अप), यजना राठोड (तिसरी रनर अप), किमया कांबळे (तिसरी रनर अप) आहेत.



# जप्त मुद्देमालाबाबत पोलिसांचे आवाहन

**पनवेल :** तळोजा पोलिसांनी विविध गुन्ह्यांमध्ये जप्त मुद्देमालाची संबंधितांनी मालकी हक्काबाबत संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. तळोजा पोलिसांनी टाटा कंपनीचा ट्रक, हायवा डंपर, चौकलेटी टेम्पोची हाफ बॉडी, दोन चॉकलेटी ट्रकची हाफ बॉडी, एक चॉकलेटी ट्रकची फुल बॉडी, एक लाल ट्रकची केबिन, एक गुलाबी टाटा कंपनीचे ट्रकची केबीन, एक चॉकलेटी आयशर टेम्पोची कॅबीन अश्या मुद्देमालाची मालकी हक्काबाबत संबधीत व्यक्तींना तळोजा पोलीस ठाणे (०२२-२७४१२३३३), किंवा वरिष्ठ निरीक्षक अविनाश काळदाते (९८६७७९७१७२), हवालदार विजय निवळे (९८२१२२६८१२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# काँग्रेसचा मंदिरविरोध

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी मंगळवारी पुन्हा एकदा अयोध्येतील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावरून गरळ ओकली. हा भाजप व रा.स्व. संघाचा, मोदींचा राजकीय कार्यक्रम असल्यामुळे आपण तिथे जाणे शक्य नाही असे सांगत आपण सर्व धर्मांसोबत आहोत असे प्रतिपादन त्यांनी केले. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान त्यांनी हे विधान केले असून श्रीराम मंदिराविरोधातील त्यांची ही भूमिका आगामी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेसला चांगलीच महागात पडणार, असे मत राजकीय पंडित व्यक्त करीत आहेत.

**काँग्रेस खासदार राहुल गांधी आपल्याच आगळ्या दुनियेत राहतात. त्यांचा सर्वसामान्य भारतीयांच्या मानसिकतेशी काहीही संबंध नाही. कुठल्याही सर्वसामान्य भारतीय व्यक्तीसाठी प्रभू श्रीरामांना निव्वळ मंदिरात वा घराच्या देव्हाऱ्यात स्थान नसून मनामनांत श्रीराम वसत असल्याची कल्पनाही राहुल गांधींना नसावी. त्यामुळेच अवघा देश श्रीराममंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची आतुरतेने वाट पाहात असताना, राहुल गांधींनी मात्र मंगळवारी आपली निधर्मी विचारसरणी माध्यमांसमोर ठेवणे पसंत केले. त्यांच्या या सर्वधर्मप्रेमावर 'टुकडे टुकडे' टोळीतील मोजकी मंडळी खुश होतीलही कदाचित, परंतु देशातील सर्वसामान्य भारतीयांच्या मात्र हे पचनी पडणे कठीणच आहे असे मत राजकीय पंडित व्यक्त करत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय जनता पक्षाने २२ जानेवारीच्या कार्यक्रमाला पूर्णपणे राजकीय रंग दिला असल्यामुळे काँग्रेस पक्षाकडून कुणीही या कार्यक्रमाला जाणार नाही असे राहुल गांधी यांनी आता सांगून टाकले आहे. आपण सर्वधर्मियांसोबत असून अन्य कुणालाही या कार्यक्रमाला जायचे असल्यास ते जाऊ शकतात असे विचित्र विधान राहुल गांधी यांनी करणे खरे तर आश्चर्यकारकही म्हणता येत नाही. आपण हिंदु धर्माचे पालन करतो, परंतु हा धर्म अंगावर मिरवत नाही. जे या धर्माचा आदर करत नाहीत, त्याचे पालन करत नाहीत, ते दिखावा करतात असेही राहुल गांधी बरळले आहेत. २२ जानेवारीला आपण यात्रेच्या निर्धारित वेळापत्रकानुसार आसाममध्ये असू असेही त्यांनी पत्रकारांना सांगून टाकले. देशातील जनता सुजाण आहे. त्यांना राहुल गांधींची ही राजकीय विधाने नीट कळतात. त्यांचा काँग्रेस पक्ष स्वातंत्र्यप्राप्तीपासून नेमके कुणाचे लांगुलचालन करत आला आहे आणि आता तेही ही अशी विधाने कुणाला खुश करण्यासाठी करीत आहेत ते सर्वसामान्य भारतीयांना नीट कळते. त्यामुळे देशातील जनताच आगामी निवडणुकीत राहुल गांधींना याचे योग्य ते प्रत्युत्तर देईल असा टोला भारतीय जनता पक्षाने राहुल गांधींच्या या बडबडीनंतर लगावला. तसे पाहिले तर राहुल गांधी यांच्या या विधानांमध्ये नवीन काहीच नाही. त्यांचे गुरू सॅम पित्रोदा यांनीही अलीकडेच हीच विधाने केली होती याची आठवण केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी करून दिली. श्रीराममंदिर हा कोट्यवधी भारतीयांसाठी अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. राहुल गांधी यांना काय वाटते याने त्यात काहीही फरक पडणार नाही हे चंद्रशेखर यांचे विधान वास्तवावर नेमके बोट ठेवणारेच आहे. भारतीयांच्या श्रद्धेला कुणीही आपल्या मर्जीप्रमाणे हवे तिकडे वळवू शकतो असा भ्रम कदाचित राहुल गांधी यांना झाला असेल, पण ते तिळमात्रही खरे नाही. अयोध्येतील श्रीराममंदिराला आयुष्यात एकदा तरी भेट द्यावी असे प्रत्येक भारतीयाला वाटते आहे आणि तसा प्रयत्न ते नक्कीच करतील. आणि त्यामागे निव्वळ श्रीरामावरील अपार श्रद्धा हेच कारण असेल.**

# अपंगांना दिलेल्या जागेत अनधिकृत भाडेकरू

**खबरबात**
**नितीन देशमुख**





पनवेल महापालिका हद्दीत अपंगांना दिलेल्या जागा भाड्याने व्यवसायासाठी दिलेल्या दिसत आहे. त्यामुळे अपंगांना स्वतःचे पायावर उभे करण्याचा मुळ उद्देश सफल झालेला दिसत नाहीच, पण खऱ्या गरजू अपंगांना मात्र जागेपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे शासनाने व महापालिकेने याबाबत कारवाई करून खऱ्या गरजू अपंगांना या गळ्यांचे वाटप करणे गरजेचे आहे

आपल्या रायगडमध्येही असे अनेक जण आहेत की साध्या अपघाता नंतर अपंगाचे दाखले घेऊन सगळ्या सवलती घेत आहेत, पण प्रत्यक्षात अपंग असलेल्या कित्येकांना असे दाखले मिळतात हेच माहीत नाहीत. त्यांच्यापर्यंत शासन पोहचत नाहीत. पनवेल महापालिका आयुक्तांनी ही मध्यंतरी अपंगांची नोंदणी होत नसल्याची खंत व्यक्त केली होती. पनवेल महापालिकेतर्फे अपंगांना व्यवसायासाठी गाळे किवा जागा दिल्या आहेत, पण अनेक ठिकाणी तेथे अपंग व्यक्ती कोणताही धंदा न करता त्या मोक्याच्या जागा भाड्याने देत असल्याचे माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी केलेल्या पाहणीत दिसून आले होते.

शासनाने दिव्यांगांना सवलती दिल्याने त्याचा गैरफायदा अनेक जण घेत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी सिव्हिल सर्जनला पैसे देऊन खोटे अपंगाचे दाखले घेण्यात आलेले आहेत. याच व्यक्तींना सगळ्या सवलती मिळत असल्याचे दिसून येत आहे. खरे अपंग या सवलतीपासून वंचित आहेत. एसटीमध्ये धावत येऊन गाडी पकडणारा अपंग पायाने अपंग असतो. एका कार्यालयात अपंग म्हणून सवलत घेणारी व्यक्ती कार्यालयात कुबड्या घेऊन यायचा नंतर पुढे काही अंतर जाऊन तो दुचाकीवर पत्नीला घेऊन जात असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी शासन प्रयत्न करताना दिसत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. पनवेल महापालिका हद्दीत दिव्यांगांची संख्या तीन हजारचे आसपास आहे. पूर्वीच्या नगर परीषदेने व्यापारी संकुलात दिव्यांग व्यक्तींना सन २०१५-१६मध्ये तीन टक्के आरक्षण देऊन आठ गाळ्यांचे वाटप केले होते. माजी महापौर कविता चौतमोल यांनी महापालिका या गाळ्यांना भेट दिली असता नाट्यगृहा जवळील इमारत क्रमांक १ मधील व्यापारी संकुलात चार गाळ्यांपैकी गाळा एकमेव गाळयात दिव्यांग व्यवसाय करताना दिसून आले होते.

नवीन पनवेल रेल्वेस्टेशन बाहेर आधीच लोकांना चालायला फुटपाथ शिल्लक नाही. त्यातच एका अपंगाने त्याला मिळालेली जागा उसाच्या रसवाल्याला भाड्याने दिली आहे.

हळूहळू हा भाडेकरू ती जागा वाढवत चालला आहे. त्याने रस्त्यातच उस आणि त्याचा कचरा ठेवला आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. चालायला ही जागा नसल्याने स्टेशनवर येणाऱ्या-जाणाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे. त्याच्यावर काही वेळा अतिक्रमणवाले येऊन थोडीशी कारवाई केल्याचे दाखवतात. आता त्याच्या आश्रयाने हळू हळू कुर्लाहून येऊन काही तरुण तेथे छोटे-छोटे धंदे लावताना दिसत आहेत. या भागात शाळा व महाविद्यालये आहेत. तेथे अनेक तरूणी येत असतात. हा रस्ता अशा प्रकारे व्यापून टाकला आणि यातून काही प्रकार घडला तर त्याची जबाबदारी प्रशासन घेणार आहे काय? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. याबाबत महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना विचारले असता त्यांनी आमच्याकडे तक्रार आल्यास आम्ही कारवाई करू ज्या व्यक्तीला ती जागा दिली आहे त्याच्याकडून ती काढून घेण्यात येईल, असे सांगितले होते.

खोटे अपंगच सगळ्या योजनांचे लाभ घेत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत शासनाने कडक कारवाई करणे गरजेचे आहे. खोटे दाखले देणाऱ्या सिव्हिल सर्जनवर कारवाई करणे ही गरजेचे आहे. एस.टी. महामंडळाने ही आपले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून नवीन संगणकीय ओळखपत्र देण्यात येणार आहेत त्याचा आग्रह धरणे गरजेचे आहे. अपंगत्वाच्या टक्केवारी प्रमाणे ही ओळखपत्र वेगवेगळ्या रंगाची असून त्याच्यावर सिव्हिल सर्जन व अस्थि रोग तज्ञाची स्वाक्षरी असेल. यामुळे खोट्या ओळखपत्रांना आळा बसेल. अपंग भिकारी रेल्वे स्टेशन किंवा शहरात मोक्याच्या ठिकाणी आणून ठेवले जातात त्यांच्यामार्फत भीक मागण्याचा धंदा ही केला जात आहे. त्यांना पोलिसांमार्फत पकडून आणून त्यांची व्यवस्था बेघर निवासामध्ये करून त्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांपासून संरक्षण देणे गरजेचे आहे.

# समाजसेविका शकुंतला परांजपे



शकुंतला रघुनाथ परांजपे यांचा जन्म १७ जानेवारी १९०६ रोजी पुणे येथे झाला. प्रारंभीचे शिक्षण घरी व नंतर माध्यमिक शिक्षण पुण्याच्या हुजूरपागा हायस्कूलमध्ये झाले.

१६व्या वर्षी मॅट्रिक. १९२६ साली मुंबई विद्यापीठाची बीएस्सीची परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण. पुढील अभ्यासक्रम विलायतेत पूर्ण करण्यासाठी हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ती. १९२९ साली केंब्रिजमधील गणिताची ट्रायपॉस उत्तीर्ण. जिनिव्हाला इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनमध्ये काही वर्षे नोकरी. जिनिव्हामध्ये युरा स्लेप्ट ऑफ श्वेत- रशिअन गृहस्थाशी विवाह झाला. १९ मार्च १९३६ रोजी मुलीचा (सई परांजपे) जन्म झाला. आपल्या आजीचे सई हे नाव मुलीला ठेवले. १९३७ साली स्वित्झर्लंडच्या कायद्याप्रमाणे घटस्फोट घेऊन मुलीसह त्या हिंदुस्थानात परतल्या. त्या दोघींचेही वास्तव्य वडील रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्याकडे होते.

शकुंतला परांजपे हिंदुस्थानात परतल्यावर त्यांनी संततिनियमनाच्या प्रचाराचे कार्य पुष्कळ वर्षे हिरिरीने केले. या कामातील त्यांचे स्फूर्तिस्थान म्हणजे महर्षी कर्वे यांचे चिरंजीव व शकुंतला बाईंचे भाऊ आणि संतती नियमनाच्या कार्याचे प्रवर्तक रघुनाथ धोंडो कर्वे हे होत. या कामासाठी शकुंतला परांजपे यांनी काही काळ पुणे महानगरपालिकेच्या दवाखान्यात नोकरी केली. १९५८ साली राज्य सरकारने त्यांची नियुक्ती विधानसभेवर केली. त्यानंतर १९६४ साली, राज्यसभेवरही सहा वर्षांसाठी त्यांची नेमणूक झाली. संततिनियमनाच्या संदर्भात 'पाळणा लांबवायचा की, थांबवायचा?' हे पुस्तक आणि र.धों.कर्वे यांच्या 'समाजस्वास्थ्या'तून काही लेखन केले. 'काही आंबट काही गोड' या पुस्तकातील 'राष्ट्रपती नियुक्तीची सहा वर्षे' या लेखातही या कार्यासंबंधीचे अनुभव आले आहेत.

शकुंतला परांजपे यांचे ललितगद्य, कादंबरी आणि नाटक या तीनही साहित्यप्रकारांतील लेखन वेधक आहे. ललितगद्यामधील पहिला संग्रह 'भिल्लिणीची बोरे' (१९४४). हा संग्रह हरी नारायण आपटे यांना अर्पण केला असून त्या अर्पणपत्रिकेतून लेखिकेला हरिभाऊंबद्दल वाटणारा नितांत आदर व्यक्त होतो. या संग्रहातील लेखांमधून रोजच्या आयुष्यात घडणारे विविध अनुभव खेळकर शैलीत व्यक्त झाले आहेत.


सई परांजपे यांनी म्हटल्याप्रमाणे शकुंतलाबाईंचा स्पष्टवक्तेपणा यातील लेखनातही उतरला आहे. लेखांची भाषा साधी, घरगुती असून मोकळ्या विनोदामुळे लेख बोधप्रद असूनही बोध देणारे वाटत नाहीत. समाजाकडे आणि स्वतःकडे बघण्याची मिस्कील दृष्टी, नर्म विनोद, हलकी-फुलकी, खुसखुशीत लेखनशैली या वैशिष्ट्यांमुळे सर्वच ललितलेखन लोकप्रिय ठरणारे आहेत.

**-डॉ. नंदा आपटे**

## बदलते तंत्रज्ञान



# 'ॲण्ड्रॉइड 14' वापरकर्त्यांना फोन हॅकिंगचा सर्वाधिक धोका



भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद संघ म्हणजेच CERT-In ने, जे स्मार्टफोन वापरकर्ते अँड्रॉइड १४ किंवा त्याहून जुन्या व्हर्जनचा वापर करत असतील, त्यांना हॅकिंगचा सर्वाधिक धोका असल्याची सूचना दिली आहे. नुकत्याच जारी केलेल्या व्हल्नेरेबिलिटी नोट (CIVN-2024-0008) नुसार, सरकारी एजन्सीने या जुन्या व्हर्जनमध्ये अनेक त्रुटी दाखवल्या असून, त्याचा वापर करून हॅकर्स तुमची अत्यंत महत्वाची आणि खाजगी माहिती मिळवू शकतात, अशी सूचना प्रसिद्ध केली आहे; असे इंडिया टुडेच्या एका लेखावरून समजते.

CERT-In च्या माहितीनुसार, फ्रेमवर्क, सिस्टीम, गुगल प्ले सिस्टीम अपडेट्स, विविध उत्पादकांचे वापरलेल्या हार्डवेअरमधील समस्या, आर्म कॉम्पोनंट्स, इमॅजिनेशन टेक्नॉलॉजी, मीडिया टेकचे घटक, युनिस्को घटक, क्वालकम घटक, इत्यादींसारख्या गोष्टींमध्ये त्रुटी असल्याने, अँड्रॉइड १४ आणि त्यापेक्षा जुनी व्हर्जन असुरक्षित असल्याची चेतावणी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या नोटमध्ये लिहिले आहे.

CERT-In च्या माहितीनुसार, अशा त्रुटींमुळे हॅक करणाऱ्या व्यक्तीला बऱ्याच चुकीच्या गोष्टी करण्याची संधी मिळू शकते.

तुमचे सर्व खासगी पासवर्ड, ई-मेल, फोटो, फोन नंबर, आर्थिक गोष्टींबद्दल माहिती हॅकर्स अगदी सहज मिळवू शकतात.

खाजगी माहिती व्यतिरिक्त एखादा हॅकर तुमच्या उपकरणावर संपूर्ण ताबा मिळवू शकतात. ताबा मिळवल्यानंतर उपकरणांसाठी हानिकारक असणारे ॲप इन्स्टॉल करणे, तुमच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवणे; इतकेच नाही तर इतरांच्या फोनवर तुमचे उपकरण वापरून हल्ला करण्यासाठी हॅकर्सना संधी मिळू शकते.


बॅटरी ड्रेन होणे, फोनमध्ये बिघाड होणे किंवा पूर्णतः खराब होणे, प क्रॅश होण्यासारख्या समस्यांनादेखील वापरकर्त्यांना सामोरे जावे लागू शकते.

याचा परिणाम कोणत्या स्मार्टफोनवर होऊ शकतो?

ज्यांचे फोन ११, १२, १२ङ, १३ आणि १४ या अँड्रॉइड व्हर्जनवर काम करत आहेत, अशा सर्व स्मार्टफोनला सर्वाधिक धोका असू शकतो. यामध्ये मोठमोठ्या कंपन्यांचे, सॅमसंग, ओप्पो, शाओमी, गुगल पिक्सेल, वन प्लस इत्यादी ब्रॅण्ड्सचा समावेश आहे. अशी माहिती इंडिया टुडेच्या एका लेखावरून समजते.

# गणितज्ञ दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर

**निमित्त**



कापरेकरांच्या आयुष्यात त्यांच्या वाटेला फक्त आणि फक्त अवहेलना आली, त्यांचे एक-दोन प्रबंध काही गणितांच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले, मात्र इतर सगळे नाकारले गेले. नाराज न होता कापरेकर आपले संशोधन नाशिकच्या साध्या प्रेसमधून छापून लोकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये वाटायचे. शहरी गणितज्ञ त्यांच्या शोधांची खिल्ली उडवायचे, मात्र कापरेकरांचे निधन झाल्यावर या सगळ्यांना त्यांच्या शोधांची महती व महत्त्व समजले.

एका मराठमोळ्या शाळामास्तरबद्दल ज्यांनी गणितातले उच्चशिक्षण घेतले नसतानाही कित्येक शोध लावले, त्यांच्या शोधांमुळे व कष्टाने त्यांना 'गणितानंद' ही उपाधी मिळाली. १७ जानेवारी १९०५ रोजी डहाणू येथे जन्म झालेल्या या माणसाचे नाव होते दत्तात्रय रामचंद्र कापरेकर, वडील कारकून, त्यात वडिलांना ज्योतिषाचा अभ्यास करण्याची हौस होती, ज्योतिषात करावी लागते तितकी आकडेमोड वडिलांनी दत्तात्रयला शिकवलेली, पण दत्तात्रयाला तीच आवडली व त्याने तीच आकडेमोड आयुष्यभर केली. पुढे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजला पदवी घेत असताना, त्यांनी रँग्लर परांजपे ॲवॉर्ड मिळवले. जे गणिताच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांला मिळायचे. बी.एस्सी.ची पदवी घेताच, कापरेकर नाशिकजवळच्या देवळाली येथे शाळामास्तर म्हणून रुजू झाले ते आयुष्याच्या अखेपर्यंत तिथेच राहिले.

कापरेकरांच्या आयुष्यात त्यांच्या वाटेला फक्त आणि फक्त अवहेलना आली, त्यांचे एक-दोन प्रबंध काही गणितांच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले, मात्र इतर सगळे नाकारले गेले. नाराज न होता कापरेकर आपले संशोधन नाशिकच्या साध्या प्रेसमधून छापून लोकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये वाटायचे. शहरी गणितज्ञ त्यांच्या शोधांची खिल्ली उडवायचे मात्र कापरेकरांचे निधन झाल्यावर या सगळ्यांना त्यांच्या शोधांची महती व महत्त्व समजले.

कापरेकरांचे संशोधन काळाच्या खूप पुढे होते, नंबर थिअरी म्हणून आज जिचा गवगवा आहे त्यातले कित्येक मूलभूत शोध कापरेकरांनी स्वतंत्ररीत्या लावले होते. त्यांनी लिहिलेल्या लेखांची मग पारायणे झाली, उजळण्या झाल्या. त्यांच्या लेखांवर कित्येक गणितज्ञ लोकांनी पीएच.डी. केल्या. 'माणूस मरावा अन् मग त्याची किंमत कळावी' हे कापरेकरांच्या बाबतीत खरंच घडले होते.

आता पाहूया दत्तात्रय रामचंद्र कापरेकरांचे काही खास शोध, त्यानिमित्ताने तुमच्या गणिताची उजळणीही होऊन जाईल. कापरेकर कॉन्स्टंट : ६१७४ ही संख्या कापरेकर कॉन्स्टंट म्हणून आज ओळखली जाते. तुम्ही कुठलीही चार अंकी संख्या गृहीत धरा, समजा आपण ४६३७ ही संख्या गृहीत धरू, आता या संख्येतील आकडे एकदा असे मांडा की, संख्या शक्य तितकी मोठी होईल व एकदा असे मांडा की संख्या शक्य तितकी लहान होईल. म्हणजे मोठी संख्या होईल ७६४३ आणि लहान संख्या ३४६७. आता लहान संख्या मोठ्या संख्येतून वजा करा, तुम्हाला मिळेल ४१६७, आता ही संख्या (४१६७) कापरेकर पद्धतीने मांडून पुन्हा मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा.

**तुम्हाला मिळेल ६१४७**
**अर्थात कापरेकर कॉन्स्टंट**

तुम्ही जगातली कुठलीही चार अंकी संख्या घेऊन हा प्रयोग करू शकता, त्यांचे उत्तर हे एकतर शून्य येईल किंवा कापरेकर कॉन्स्टंट ६१४७. अचाट शोध लावणाऱ्या कापरेकरांचे आयुष्य मात्र हलाखीतच गेले, म्हातारपणी पेन्शन अपुरी पडू लागल्यावर त्यांना गणिताच्या शिकवण्या घ्याव्या लागल्या. १९५३ साली स्क्रिप्टा मॅथेमॅटिका या जर्नलमध्ये त्यांचा शोधनिबंध प्रकाशित झाला होता. ती जगाने घेतलेली त्यांची दखल होती. अखेर मार्टिन गार्डनर नावाच्या प्रसिद्ध गणितज्ञाने १९७५ साली सायंटिफिक अमेरिकन या जागतिक कीर्तीच्या विज्ञान मासिकात कापरेकरांच्या कामाबद्दल लिहिले.

**-अजय महाडिक**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : सद्या सर्वत्र फेस्टिव्हल-महोत्सवांचा हंगाम सुरू आहे. त्यामध्ये लहान मुलांना आकर्षित करणारे फुगे विक्रेते शहरात रस्त्याच्या फुटपाथ किंवा ब्रिजखाली आपले बस्तान मांडून तयारी करीत असतात.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# 'यांनी' अजिबात खाऊ नये पपई; वाढू शकतात समस्या

पपई खाल्ल्याने आपल्या शरीराला अनेक पोषक घटक मिळतात. आरोग्यासाठी पपई चांगली मानली जातो. पण तुम्हाला माहित आहे की, कुठल्या समस्या असल्यावर पपईचे सेवन टाळले पाहिजे. पपई जरी पोषक तत्वांनी युक्त फळ असले तरी देखील काही लोकांनी त्याचे सेवन टाळले पाहिजे. पपईमध्ये जीवनसत्त्वे, फायबर आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात.



पपई लठ्ठपणा कमी करण्यात मदत करते. पपईतून भरपूर फायबर मिळतात. मधुमेह, हृदय आणि कर्करोगाच्या रुग्णांसाठी पपई फायदेशीर मानली जाते. असे असले तरी आरोग्याच्या काही समस्यांमध्ये पपई सेवन त्रासदायक ठरु शकते.

* **किडनी स्टोन असल्यास पपईचे सेवन टाळावे :** ज्या व्यक्तींना किडनी स्टोनचा त्रास आहे अशा लोकांनी पपई खाऊ यनये. पपईत व्हिटॅमिन सी तर असतेच पण हे एक समृद्ध अँटिऑक्सिडेंट आहे. पण पपईचे जास्त सेवन स्टोनची समस्या उद्भवू शकते. पपई खाल्ल्याने कॅल्शियम ऑक्सलेटची स्थिती निर्माण होऊन स्टोनचा आकार वाढू शकतो.

* **हृदयाचे ठोके अनियंत्रित असणाऱ्यांनी पपई टाळावी :** पपई हृदयविकाराच्या आजारात चांगली असते. पण ज्यांचे हृदयाचे ठोके अनियमित आहेत त्यांनी पपई खाणे टाळले पाहिजे. पपईत सायनोजेनिक ग्लायकोसाइड आढळते जे अमीनो ॲसिडसारखे काम करते. यामुळे पचनसंस्थेत हायड्रोजन सायनाइड तयार होते आणि त्यामुळे हृदयाच्या ठोक्यांची समस्या वाढू शकते.

* **गरोदरपणात पपई खाऊ नये :** पपईमध्ये लेटेक्स असते. त्यामुळे गर्भवती महिलांनी अजिबात पपई खाऊ नये. पपई खाल्ल्याने गर्भाशयाचे आकुंचन होऊ शकते. यामुळे प्री-डिलीव्हरी होण्याचा धोका वाढतो. पपईमध्ये पपेन आढळते. अशा परिस्थितीत प्रसूती वेदना कृत्रिमरित्या सुरू होऊ शकतात.

* **ॲलर्जी असल्यास खाऊ नये :** पपईमध्ये चिटिनेज असते जे ॲलर्जीने ग्रस्त लोकांमध्ये समस्या निर्माण करू शकते. अशा लोकांनी पपई खाऊ नये. धीकधी यामुळे श्वास घेण्यात अडचण येऊ शकते. खोकला येऊ शकतो. तसेच डोळ्यांच्या समस्यादेखील उद्भवू शकतात.

* **हायपोग्लायसेमिया असलेल्या लोकांनी पपई टाळावी :** ज्या लोकांच्या रक्तात साखरेची पातळी कमी आहे त्यांनी पपई खाऊ नये. हायपोग्लायसेमियाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी देखील पपईचे सेवन करु नये. पपईमुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी आणखी कमी होते. पपई खाल्ल्याने हृदयाचे ठोके जलद होतात किंवा कधी कधी शरीर थरथरू लागते.

# मासळीची आवक घटली

## दर वाढल्याने सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री

**मुरूड : प्रतिनिधी**

सततच्या बदलत्या वातावरणाचा मासळी उत्पादनावरही परिणाम होत असल्याचे पहायला मिळत आहे. खोल समुद्रातही मुबलक मासळी मिळत नयल्याने सध्या बाजारात मासळीचे दर वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. मटणापेक्षा मासळीचे दर अवाजवी झाल्याने लोक आपोआप चिकनकडे वळले आहेत.

साधी कोळंबी छोट्या टोपलीतून दिली जाते तिची किंमत ३५० रुपये वाढल्याने सामान्यांना कोळंबी दुरापास्त झाली आहे. पापलेट तर



मार्केटमध्ये फारच तुरळक दिसत आहेत.

नुकताच मासळीचा मोठा हंगाम झाला. त्या वेळी मासळी खूप स्वस्त दरात मिळत होती, परंतु मागील काही दिवसांपासून मासळीचे दर कमालीचे वाढल्याने सर्वजण त्रस्त झाले आहेत. याबाबत मच्छिमारांकडून असे सांगण्यात येत आहे की, खोल समुद्रात जाऊनही मुबलक

**असे आहेत दर**

| | | |
|---|---|---|
| मोठी सुरमई | एक नग | २५०० रु. |
| मध्यम सुरमई | एक नग | १५०० रु. |
| रावस | एक नग | ८०० रु. |
| कोळंबी | एक किलो | ६०० रु. |
| हलवा | मोठी साईज | १५०० रु. |

मासळी मिळत नाही. तुरळक मासळी मिळत असल्याने बाजारात मासळीचे दर वाढले आहेत, तसेच खोल समुद्रात एलईडीद्वारे मासेमारी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांना मासेच मिळत नाही.

याबाबत रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, सकाळच्या प्रहरी मथलाई वारे वाहत आहेत. त्यामुळे थंडीसुद्धा वाढली आहे. हवामानात बदल झाल्याने मासळी दूरवर निघून गेली आहे. वातवरणात समतोलता आल्यानंतर पुन्हा मासळी मोठ्या प्रमाणात मिळेल.

# सुधागड ताडगाव आदिवासीवाडीत बहुउद्देशीय सभागृहाला मंजुरी




**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील ताडगाव आदिवासीवाडी येथे बहुउद्देशीय सभागृह उभारणीसाठी मंजुरी मिळाली आहे. हे बहुउद्देशीय सभागृह झाल्यानंतर येथील आदिवासीबांधवांना विविध बाबींचा लाभ एकाच ठिकाणी मिळणार आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान अंतर्गत अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नारायण राणे व आमदार रवींद्र पाटील यांच्या हस्ते या बहुउद्देशीय सभागृहाचे मंजुरीपत्र येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन भिमचंद्र साठे, ग्रामसेवक मयूर कारखानीस व उपसरपंच संजय चौधरी यांनी स्वीकारले.

या बहुउद्देशीय सभागृहामध्ये एक सभागृह, एएनएम केंद्र, अंगणवाडी, वर्गखोली आणि कार्यालय असणार आहे. हे बहुउद्देशीय सभागृह मंजूर

**बहुउद्देशीय केंद्र उभारल्यानंतर आमच्या आदिवासीबांधवांना एकाच ठिकाणी विविध लाभ मिळणार आहेत. त्यामुळे आम्ही भारत सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच ही योजना आमच्यापर्यंत पोहचवणाऱ्या सर्व शासकीय अधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानतो.**

**–सचिन साठे, सामाजिक कार्यकर्ते, ताडगाव**

करून आणण्यासाठी ग्रामसेवक मयूर कारखानीस, केतन साठे, सरपंच करुणा भिमचंद्र साठे, उपसरपंच संजय चौधरी आणि सर्व सदस्य यांनी पुढाकार घेऊन पाठपुरावा केला.


# खोपोली आंबिवलीतील स्मशानभूमीचा रस्ता खचला

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील ग्रुप ग्रामपंचायत माजगांव हद्दीतील आंबिवली येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता खचल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

या ठिकाणी छोटा ओढा असून या ठिकाणी मोरी खचली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या ठिकाणी रस्ता खचला असून खचलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

आंबिवली येथे ओढ्याच्या ठिकाणी ही स्मशानभूमी असून, सावरोली–खारपाडा



रस्त्यालगत असून थोडे अंतर चालत कापावे लागते. याच ठिकाणी रस्ता खचल्यामुळे अंतिम संस्कारासाठी लागणारी लाकडेही वाहून नेण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.

मोरी खचून खड्डा पडला असल्याने तातडीने या ठिकाणी उपाययोजना करावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.

**आंबिवली येथील स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता खचला असून यासंदर्भात आम्ही लवकरात लवकर काम हाती घेऊन रस्ता पूर्ववत करणार आहोत.**

**–दिपाली पाटील, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत माजगांव**

# नेरळच्या एकविरा आई पालखीचे कार्ला गडावर प्रस्थान

**कर्जत : प्रतिनिधी**

एकविरा आई नेरळ गाव व परिसराची मानाची पालखी सोहळ्याला संक्रातीच्या शुभमुहूर्तावर सोमवारी (दि. १५) सुरुवात झाली. नेरळ हेटकरआळी गणेश मंदिर येथून या आदीशक्ती आईची पालखी कार्ला एकविरा गडाच्या दिशेने ढोल, ताशा, ब्रास बॅण्डच्या तालावर वाजत– गाजत भक्तिभावाने प्रस्थान केले.

दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. १६) एकविरा गडावर ही पालखी पोहचली. गडावरदेखील विविध माध्यमातून उत्सव सोहळा हा उत्साहात साजरा केला गेला. नेरळ येथे पालखीचे विधिवत पूजन केल्यानंतर पालखी श्री गणेश मंदिरातून एकवीरा गडाकडे प्रस्थान करण्यात



आली होती.


या पालखीत हजारो तरुण मंडळी सहभागी झाली होती. आईची पालखी या वेळी खास सजवलेली पहायला मिळाली.

पालखीचा कळस म्हणून अयोध्यातील राम जन्मभूमी येथे साकारण्यात आलेले रामलल्लाच्या मंदिराची प्रतिकृती दाखवण्यात आली होती. पालखीचे भोई झालेल्या तरुणांच्या पायाचे दर्शन घेत येथील महिला वर्गाने आईची आरतीची ओवाळणी करीत गाऱ्हाणेदेखील घातले.

या पालखी सोहळ्यात या वेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पंचक्रोशीतील तरुण एकत्र आले होते.


॥ श्री ॥

**सदगुरु ज्योतिष (पनवेल)**




कॉम्प्युटराईअ, जन्मकुंडली बनवून मिळेल
शुभ कार्यासाठी पंचाग मुहुर्त, विवाह गुणमेलन
वैयक्तिक समस्यांसाठी कुंडलीद्वारे सल्ला मार्गदर्शन
ओरीजनल नवग्रह रत्न । उपरत्न मिळतील'

**संपर्क :– सदगुरु ज्योतिष १६०सुमित्रा सदन, शाँप ने १ केतकी हॉटेल समोर, शिवाजी रोड पनवेल जि. रायगड.**

**मो. नं.९७०२९३५३२८/९०२९८५०५८०**


# खोपोलीत राष्ट्रवादीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन




**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खोपोली शहर जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

आगामी खोपोली नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाले.

या वेळी रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, माजी नगराध्यक्ष तथा प्रदेश सरचिटणीस दत्ताजी मसुरकर, खोपोली शहराध्यक्ष मनीष यादव, प्रदेश सरचिटणीस अशोक भूपतराव, युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष रमेश जाधव, माजी नगरसेवक तुकाराम साबळे, मंगेश दळवी, महिला आघाडीच्या वैशाली जाधव, माजी नगरसेवक महादू जाधव, सचिन मसुरकर, माजी नगरसेविका उर्मिला देवकर, केवीना गायकवाड, रवी देवकर, युवा नेते निलेश आवटी, विनायक तेलवणे, शहर युवाध्यक्ष अल्पेश थरकुडे, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:-** EE/EHV (O &M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-40/2023-24 Dtd.17.01.2024 **RFxNo.** 7000029653 | **Name of work :-** Invitation SRM E-tender Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220 kV Kandalgaon SS, 100 kV Roha SS & 100 kV Mhasala SS under EHV (O&M) Division Mahad. | **Rs.17,39,204/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST.
Bid submission is from 17.01.2024 @ 00:00 hrs to 23.01.2024 @23:59 Hrs for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**~Sd~**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**


# कापडी बॅगवाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

* महड येथे राबविला उपक्रम
* नागरिकांनी घेतला लाभ



**महड (मोहोपाडा) : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, प्रसोल केमिकल लिमिटेड होनाड, आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल, वरदविनायक देवस्थान महड आणि खालापूर तालुका पत्रकार संघ यांचा संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१६) मोफत डोळे तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर झाले.

या शिबिराचा १७९ नागरिकांनी लाभ घेतला. प्लास्टिकमुक्त महडसाठी प्रसोल केमिकल लिमिटेड व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे कापडी बॅग वाटप करण्यात आले. या वेळी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण जाधव, नियती एंटरप्रायझेसचे निलेश जाधव, रवींद्र भोपी, संतोष गुरव, नगरसेविका खालापूर श्वेता गुरव, माजी सरपंच खालापूर जयवंती भोपी, राजेश गावडे, दीपक मिरकुठे, अनंत पाटील, कैलाश पाटील, नामदेव पाटील, दर्शन पवार आदी उपस्थित होते.




**जहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे तुर्भे, ता. पनवेल, जि. रायगड, येथील जमीनीचे मुळ मालक विठाबाई उर्फ विठा दगडू पाटील, नागुबाई शांताराम माळी, विष्णु कृष्णा पावशे, चरपट कृष्णा पावशे, निर्मला लक्ष्मण शेळके, शोभा कृष्णा पावशे, भारती उर्फ भारतीबाई मारूती पाटील, गजानन सिताराम पावशे, आशा प्रकाश म्हात्रे उर्फ आशा प्रकाश निमडे, मोतीराम सिताराम गायकर, बाळाराम सिताराम गायकर, यांचेकडून आमचे अशिलांनी खरेदी करणेचे ठरविले आहे, सबब सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तूत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे –

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तुर्भे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| अनु.क्र | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ४६ | ३ अ | ००–४४–०० एकूण क्षेत्रा पैकी ००–२६–०० गुठे इतक्या विक्रिच्या क्षेत्रा पुरते | ४.४४ पैकी २.६२ |

सदरहू मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही भागावर करार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्तखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल व सदरहू मिळकतीचा वरीलप्रमाणे व्यवहार पुर्ण केला जाईल, मुदतीनंतर आलेल्या तक्रारी, दावे अगर हरकती यांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी

**सही/–**
**ॲड. स्वानंद मा. नवाळे.**
**बी.एस.सी. एल.एल.बी.**

पत्ता :– शॉप नं. ८, श्री. लक्ष्मी बिल्डींग, को. ऑप. हौ. सोसायटी, गोदरेज प्लाजा समोर, टिळक रोड, पनवेल.



**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

शिवम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस. क्रमांक १४३५,१४३५/अे,१४३६, शिवाजी रोड, हिरवे गुरुजी चौक, पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड, या गृहनिर्माण सहकारी संस्था आणि सरस्वती अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस. क्रमांक १४३४ ब, शिवाजी रोड, हिरवे गुरुजी चौक, पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड, या गृहनिर्माण सहकारी संस्थेने आपल्या इमारतींचा संयुक्त पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे.

सदर प्रकल्प अहवालाचीसंस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक १७/०१/२०२४ ते दिनांक १७/०२/२०२४ या कालावधीत सकाळी ११–०० ते दुपारी ०२–०० व दुपारी ०४–०० – ६–०० या वेळेत या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांना पाहणी करता येईल, व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक १७/०१/२०२४ ते दिनांक १७/०२/२०२४ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ०२–०० व दुपारी ०४–००६–०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदाना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यांत येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

**सही/–** **चेअरमन** | **सही/–** **सेक्रेटरी**
शिवम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.

**सही/–** **चेअरमन** | **सही/–** **सेक्रेटरी**
सरस्वती अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.

**श्री. रमेश चौधरी** मो. ९१८६५२०१६३२७ | **डॉ. मिलिंद घरत** मो .९१९८२०१७६७४४



**मा. मुजावर मॅडम**
**अर्जदाराचे वकील**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
नि. क ८/ड
प्रोसेस जमा रु. ५०/–
ने.ता. २३/०२/२०२४

**मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर पनवेल यांचे कोर्ट**
चौकशी. अर्ज क्र. २४/२०२४

**१. श्रीमती मालती योगेन्द्रनाथ त्रिपाठी**
**२. श्री. अमित योगेन्द्रनाथ त्रिपाठी**
**३. श्री. संदीप योगेन्द्रनाथ त्रिपाठी** .............अर्जदार

**जाहिर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी **कै. योगेन्द्रनाथ शिवशंकर त्रिपाठी** यांचे दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुअस्थ हॉस्पीटल, रोडपाली, पनवेल येथे निधन झाले. **कै. योगेन्द्रनाथ शिवशंकर त्रिपाठी** यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पालीदेवद, ता. पनवेल, जि. रायगड येथील सदनिका मिळकत ''वृंदावन कॉम्प्लेक्स'', सदनिका क. ०२, तळमजला, प्लॉट नं. ६, टाईप डी, फेज ll, प्लॉट नं. २ व ३, गट नं. १९, हिस्सा नं. ए (३), क्षेत्र ७५५ चौ. फुट**

मयत **कै. योगेन्द्रनाथ शिवशंकर त्रिपाठी** यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. योगेन्द्रनाथ शिवशंकर त्रिपाठी यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक १६/१/२०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **लिपीक** **दिवाणी न्यायालय (क. स्तर)** **पनवेल, जिल्हा रायगड** | शिक्का | **सही/–** **सह. अधीक्षक** **दिवाणी न्यायालय (क. स्तर)** **पनवेल, जिल्हा रायगड**

## निवडक

### चिर्ले येथील गोदामाला आग



**उरण :** जासई व चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील मालाची हाताळणी करणाऱ्या वैष्णो लॉजिस्टीक पार्क या गोदामाला सोमवारी (दि. १५) भीषण आग लागल्याची घटना सकाळी ९.३०च्या सुमारास घडली होती. गोदामात बेकायदेशीरपणे ठेवण्यात आलेल्या अतिज्वलंशील केमिकलमुळे आग लागल्याचे स्पष्ट झाले असून अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. या आगीत गोदामातील कामगार थोडक्यात बचावले असल्याची माहिती कामगारांकडून प्राप्त झाली.

### बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे ग्राहकांसाठी उपक्रम



**पनवेल :** बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई झोनने वाशी येथे कस्टमर  कनेक्ट व आऊटरिच उपक्रमाचे आपल्या ग्राहकांसाठी आयोजन केले. या वेळी बँकेचे वरिष्ठ कार्यकारी संचालक, आशिष पांडे, नवी मुंबई झोनचे झोनल मॅनेजर संदीपकुमार चौरासिया, उप झोनल मॅनेजर, प्रकाश उके, सहायक महाप्रबंधक, पिंकी राणी, मुख्य प्रबंधक, दिलीपकुमार उपाध्याय, प्रतिक फाले व संगिता देसाई उपस्थित होते. बँकेचे सर्वांत जुन्या ग्राहकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात १००.०० कोटी रुपयांची कर्ज मंजुरी ग्राहकांना देण्यात आली. कार्यक्रमास बँकेचे शाखा प्रबंधक, अधिकारी, कर्मचारी व ग्राहक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यवाटप



**उरण :** प्रसिद्ध उद्योगपती तथा सामाजिक कार्यकर्ते दिपक भास्कर ठाकूर, शेलघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा शेलघर येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रघुनाथ घरत, अतुल भगत, सुधीर घरत, सचिन घरत, प्रकाश भगत, रमेश घरत, अजय भगत, मधुकर पाटील,निशिकांत सुतार,संतोष भगत, कुणाल घरत, डि. पी. सोनावणे, मनमोहन महाराज, श्री. लिंबाजी, राजू ठाकूर, प्रफुल्ल घरत, प्रल्हाद भगत आदी उपस्थित होते.

### उरण आगारात सुरक्षितता अभियान



**उरण :** रा. प. महामंडळाच्या कार्यपध्दतीमध्ये नवीन वर्षाच्या सुरवातीला रस्ते वाहतुकीत सुरक्षित प्रवास हा अत्यंत महत्वाचा भाग म्हणुन प्रवाशांची सुरक्षित वाहतुक सेवा करणारे महामंडळ म्हणून रा. प. बसेसचे रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी रा. प. महामंडळाकडुन दरवर्षी अपघात नियंत्रण उपाययोजना राज्यभर राबविण्यात येते. त्याकरीता सुरक्षीतता अभियान राबविण्यात येते. यावर्षी रा. प. मुंबई विभागात उरण आगारात सुरक्षितता अभियान–२०२४चे अभियान राबविण्याकरीता या अभियानाच्या उत्कृष्ठ शुभारंभाकरीता उरण तालुक्यातील ज्येष्ठ साहित्यिक व रायगडभुषण एल. बी. पाटील, द्रोणागिरी स्पोर्टस क्लब असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत, ग्राम अध्यक्ष मोहन भोईर व मुंबई विभागाचे विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी राजेंद्र भामरे यांनी उपस्थिती दर्शवून सुरक्षितता मोहीम फलकाचे अनावरण केले.

### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई :** ‘अजिंक्य सामाजिक संस्था, कच्छ युवक संघटना आणि जगतगुरू श्री देवनायकचार्य बिपिन शांतीलाल शाह मेमोरियल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासह डोळे तपासणी, दातांची तपासणी व विविध आरोग्य तपासण्याकरून औषधांचे निःशुल्क वाटप करण्यात आले. मोफत आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी तसेच कर्करोग संदर्भात तज्ज्ञ डॉक्टरांकडून विशेष मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ७६ रक्तदात्यांची रक्तदान केले. तर, पंचक्रोशीतील बहुसंख्ये नागरिकांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून निदान झालेल्या रुग्णांनी औषधांचा लाभ घेतला. या रक्तदान शिबिरादरम्यान आयुष्यमान भारत योजनेंतर्गत आरोग्य कार्डाची नोंदणी करण्यात आली.



# लॅपटॉप चोरणारे आंतरराज्य त्रिकूट जेरबंद

## लोकेशनमुळे नवी मुंबईतील आठ गुन्ह्यांची उकल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



आजच्या सायबर युगात आपण इलेक्ट्रॉनिक साहित्य वापरत असताना अपडेट राहणे खूप आवश्यक आहे. नवी मुंबईतून तासाभराच्या अंतराने कारच्या काचा फोडून दोन लॅपटॉप चोरी झाले होते. त्यातील एका लॅपटॉपमध्ये लॅपटॉप कुठे आहे हे लॅपटॉपचे लोकेशन बदलताच मोबाईलवर संदेश देणारी यंत्रणा असल्याने पोलिसांनी चोरट्यांचा माग काढला आणि अवघ्या २४ तासांत चोरटे जेरबंद झाले.

सेनिथील दुरायरजन कुमार, मुर्ती रामासामी चिन्नाप्पन, शिवा विश्वनाथन अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. १० तारखेला संध्याकाळी अमेय विचारे आणि अभिषेक वैखान यांनी त्यांची कार विज्ञान सोसायटी, सेक्टर १७, वाशी येथे पार्क केली होती. काही वेळाने अमेय हे आपले काम आटोपत ते जेव्हा कार मध्ये बसले त्यावेळी गाडीची काच फोडून लॅपटॉप चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. नेमके याच वेळेस या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर अभिषेक यांनाही हाच अनुभव आला होता. अभिषेक यांचा अन्य लॅपटॉप त्यांनी दुरुस्तीसाठी दिला होता. तो घेऊन आल्यावर गाडीतील लॅपटॉप कारची काच फोडून नेल्याचे समोर आले होते. दोघांनीही याबाबत वाशी पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद केला होता.

गुन्हे

यात अमेय यांच्या लॅपटॉपमध्ये एक अशी स्वयंप्रणाली होती की लॅपटॉप कुठे असेल ते मोबाईल वरून शोधता येते वा लॅपटॉपचे लोकेशन बदलले तरी मोबाईलवर संदेश येत होता. याचा फायदा तपास करताना पोलिसांना झाला तसेच गुन्हा घडल्यावर घटनास्थळा वरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. आरोपीतांचे ओळख पटवण्यासाठी नवी मुंबई, ठाणे, मुंबई परिसरातील पोलीस ठाणेमधील अभिलेख तपासण्यात आला होता. आरोपी हे घटनास्थळी पायी चालताना दिसुन येत होते. तसेच चोरीस गेलेल्या फिर्यादी यांच्या लॅपटॉपचे लोकेशन बाबत फिर्यादी यांना वारंवार त्यांच्या आय फोनवर माहिती मिळत होतीच.

अशातच १२ तारखेला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसराचे लोकेशन मिळताच याबाबत माहिती स्थानिक पोलिसांना दिली. तसेच वाशी पोलिसांचे पथक ही रवाना झाले. सुदैवाने पथक जाईपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनच्या आतील भागातील लोकेशन दाखवले गेले. रेल्वे पोलिसांच्या मदतीने तीन संशयीत इसमांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता तीन लॅपटॉप आढळून आले. त्यात अमेय आणि अभिषेक यांचाही लॅपटॉप होता. त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी दिली.

### संपूर्ण देशभर गुन्हे

आरोपी हे तमिळनाडु राज्यातून तिर्ची येथून आले होते. गेल्या २० दिवसांत पूर्ण महाराष्ट्रभर ते फिरले आहेत. या दरम्यान त्यांनी वाशी, नवघर, मुंलुंड, सी.बी. डी, नाशिक, पुणे, पंढरपुर अशा परिसरातून कारची काच फोडुन चोरी केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून एकुण सात गुन्हे उघडकिस आणण्यात यश आले आहे. याशिवाय यापूर्वी आरोपींनी संपुर्ण भारतभर अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. दरम्यान, नवी मुंबईत मोठ्या प्रमाणात चोऱ्या, घरफोड्या होत आहेत.

## सीमेवरील सैनिकांमुळे आपण सर्वजण सुरक्षित –संदीप नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील नागरिक सुरक्षित आहेत, कारण सीमेवर सैनिकांचा जागता पहारा आहे. या भावनांमधून नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी सैनिकांप्रती आपल्या कृतज्ञता व्यक्त केल्या आहेत.

थलसेना दिनानिमित्त सीबीडी येथील कोकण भवन कार्यालयाच्या प्रांगणामध्ये शासकीय–निमशासकीय सेवेतील निवृत्त सैनिकांच्या संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिर तसेच शास्त्रास्त्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रदर्शनाला लोकनेते आमदार गणेश नाईक आणि  जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी भेट देऊन सैनिकांचे देशाप्रती असलेले समर्पण, त्याग आणि देश प्रेमाला मानवंदना दिली. निवृत्तीनंतरही माजी सैनिकांमध्ये देशसेवेची भावना तेवढीच प्रखर आहे. आपल्या सैनिकांकडून कर्तव्य भावनेची प्रेरणा नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केले तर लोकनेते गणेश नाईक यांनी सैनिकांमध्ये देशसेवेची भावना चिरकाल असल्याचे सांगितले.

## जॉबच्या नावाखाली विद्यार्थ्याला घातला साडेनऊ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

पार्टटाईम जॉबद्वारे पैसे कमावण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याला टास्क फ्रॉडमध्ये अडकवून त्याला वेगवेगळ्या यूपीआय आयडीवर व कंपन्यांच्या नावावर तब्बल नऊ लाख ६६ हजार रुपये पाठवण्यास भाग पाडून त्याची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेला २३ वर्षीय तरुण मूळचा तेलंगणा राज्यातील असून, शिक्षणानिमित्त तो सध्या खारघर येथे मित्रासह राहण्यास आहे. गत मे महिन्यामध्ये या तरुणाला सायबर चोरट्यांनी टेलीग्रामवर एक लिंक पाठवून साईड बाय साईड त्याच्या सोबत काम केल्यास त्याला चांगले पैसे मिळतील, असा मेसेज पाठवला होता. त्यामुळे सायबर चोरट्यांनी पाठवलेली लिंक या विद्यार्थ्याने ओपन केली असता, व्हिडीओला लाईक केल्यानंतर त्याला डबल पैसे मिळतील, अशी माहिती त्याद्वारे त्याला देण्यात आली. या आमिषाला बळी पडून या विद्यार्थ्याने त्यास होकार दिल्यानंतर सायबर चोरट्यांनी त्याला त्याच्या टास्क ग्रुपमध्ये सामील करून घेतले. त्यानंतर त्याला टास्कमध्ये काही पैसे गुंतवण्यास सांगितले. त्यानुसार या विद्यार्थ्याने सायबर चोरट्यांनी दिलेल्या पाच–सहा कंपन्यांच्या नावाने ८० हजार रुपयांची रक्कम ऑनलाईन पाठवली. मात्र, ही रक्कम सोडवण्यासाठी सायबर चोरट्यांनी त्याच्याकडे आणखी पैशांची मागणी केली.

रक्कम दिल्यास आपली रक्कम परत मिळेल, या आशेने या विद्यार्थ्याने आणखी २० हजार रुपये पाठवले. त्यानंतर या विद्यार्थ्याने आपले पैसे परत मागितले असता, सायबर चोरट्यांनी त्याला त्याची रक्कम परत मिळवण्यासाठी आणखी काही पैशांची मागणी केली. त्यामुळे त्याने आणखी १० हजार रुपये पाठवून दिले. अशा पद्धतीने सायबर चोरट्यांनी या विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या यूपीआय आयडीवर व कंपनीच्या नावाने तब्बल नऊ लाख ६६ हजार रुपये पाठवण्यास भाग पाडले, मात्र त्याबदल्यात सायबर चोरट्यांनी या विद्यार्थ्याला काहीही न देता, त्याची फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने खारघर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली.

## काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहा दिवसीय फॅकल्टी ट्रेनिंग कार्यक्रमाच्या यशस्वी समारोपात, अंजुमन–इ–इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस, स्कूल ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी येथील संगणक विभागाने मशीन लर्निंग: एक संशोधन–आधारित दृष्टीकोन या विषयावर एक अभ्यासपूर्ण सत्र आयोजित केले.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. रमजान खाटीक, संचालक एआयकेटीसी यांच्या प्रेरणादायी भाषणाने झाली आणि भविष्यातील कार्यक्रमांची मांडणी केली. डॉ. राजेंद्र मगर, डीन ड्जएढ, यांनी कार्यक्रमाच्या थीमचे कौतुक केले, त्यांनी संशोधनामध्ये शाश्वत प्राध्यापकांच्या सहभागाची खात्री करण्यासाठी परिणाम–आधारित FDPsची अत्यावश्यक गरज अधोरेखित केली.

प्रा. तबरेज खान, एचओडी संगणक अभियांत्रिकी विभाग यांनी कार्यक्रमाचे सर्वसमावेशक विहंगावलोकन केले, तर प्रा. सफिया सदरुद्दीन आणि प्रा. रेहाल कुरेशी यांनी कुशलतेने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचा प्राथमिक उद्देश मशीन लर्निंग: अ रिसर्च–बेस्ड ॲप्रोच मधील ज्ञान वाढवणे हा होता, ज्यामध्ये प्रयोग, अल्गोरिदमिक अभ्यास आणि मशीन लर्निंग संकल्पना समजून घेण्यात सैद्धांतिक योगदान समाविष्ट असलेल्या कठोर संशोधन पद्धतीवर भर देण्यात आला होता, ज्याचा शेवट संशोधन पेपर प्रकाशनांमध्ये झाला होता.

हा कार्यक्रम अंजुमन–ए–इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अकील हाफीज, अंजुमन – ए – इस्लाम, नवी मुंबई शिक्षण समूहाचे एकझ्युकेटिव चेअरमन बुरहान हारीस, काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. रमझान खाटीक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते.

## हनीफ इस्माईल कच्छी यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्फनीने शुक्रवारी (दि. १२) पनवेल येथे आयोजित एका भव्य समारंभात हनीफ इस्माईल कच्छी यांना प्रतिष्ठित व्यावसायिक उत्कृष्टता पुरस्कार प्रदान केले.

पनवेलमधे ३०० वर्षांहून अधिक काळ आपल्या कलेची ओळख असलेल्या बैलगाडी चाक (चकजोड) उत्पादनाची शतकानुशतके जुनी परंपरा जपण्यासाठी हनिफ कच्छी यांना त्यांच्या अपवादात्मक समर्पणाबद्दल सन्मानित करण्यात आले. झपाट्याने औद्योगिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीमुळे मागणीत घट झाली असली तरी, कच्छी यांची अतूट बांधिलकी या पारंपारिक कलेची सातत्यता सुनिश्चित करते, पनवेलचा वारसा कायम ठेवते.

अशा अद्वितीय व्यक्तीचा सन्मान केल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्फनीच्या प्रयत्नांचे मान्यवरांनी कौतुक केले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मधील व्यावसायिक सेवा संचालक रोटेरियन वसंत मालुंजकर यांनी कार्यक्रमादरम्यान व्यावसायिक सेवांमध्ये रोटरीच्या महत्त्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकला. क्लबच्या अध्यक्षा रोटेरियन योगीता देशमुख यांच्यासह क्लबच्या सचिव रोटेरियन मीनल धुमाळ, क्लब व्होकेशन सर्व्हिस डायरेक्टर रोटेरियन उमेश लाड आणि इतर सदस्यांनी या दोन दिग्गजांच्या अतुलनीय योगदानाबद्दल अभिमान व्यक्त केला. शुभद व विनया वाळिंबे यांनी सुत्रसंचालन करून कार्यक्रम रंगतदार केला.




## ‘इनरव्हील’तर्फे व्यसनमुक्ती मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गाडेश्वर या ठिकाणी रविवारी (दि. १४) महिलांसाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन क्लब तर्फे हा कार्यक्रम आयोजित केला होता.

क्लबच्या सेक्रेटरी डॉ. राजश्री इंगळे बागडे यांनी या गावातील काही महिला अजूनही तंबाखू खाणे व तंबाखूची मिस्त्री लावतात या व्यसनामुळे शरीरावर होणाऱ्या गंभीर आजारांची माहिती त्यांनी दिली. स्त्रियांनी स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे तंबाखू किंवा तंबाखूची मिश्री किंवा दारू या व्यसनापासून मुक्त आयुष्य जगता येईल याची कल्पना या गावातील महिलांना दिली. गावातील महिलांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिला.

डॉ. राजश्री यांनी सातारा या ठिकाणी डॉ. प्रसन्न दाभोळकर आणि अनिमिष चव्हाण यांच्यासोबत १६ वर्षे काम केलेले आहे. दीनानाथ मंगेशकर पुणे या ठिकाणीसुद्धा त्यांनी बरीच वर्ष काम केलेले आहे. बऱ्याच महिला डॉक्टरांचा या क्लबला वेळोवेळी लाभ होतो. या कार्यक्रमासाठी प्रेसिडेंट सई पालवणकर, ॲड. शुभांगी बहिरा कल्याणकर उपस्थित होत्या.



## भाषा आणि साहित्यातून मनाची स्वच्छता राखणारे नवी मुंबई शहर –प्रा.प्रवीण दवणे

**नवी मुंबई : बातमीदार**

वर्धन म्हणजे वाढणे आणि संवर्धन म्हणजे विकास. या दोन वेगवेगळ्या गोष्टी असून आपण भाषेचे नाही तर भाषा आपले संवर्धन करते हे स्पष्ट करीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणजे भाषेचा रियाज असल्याचे मत साहित्यिक, व्याख्याते प्रा. प्रवीण दवणे यांनी व्यक्त केले. नवी मुंबई शहर स्वच्छ आहेच त्यासोबतच मनाची स्वच्छता राखण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेचा, साहित्याचा व्यापक प्रसार करण्यातही आघाडीवर असल्याबद्दल त्यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या भाषाप्रेमाची प्रशंसा केली.




महाराष्ट्र शासनाच्या वतीने १४ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत संपूर्ण राज्यभरात ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ साजरा केला जात असून नवी मुंबई महापालिकेच्या वतीनेही या पंधरवड्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या पंधरवड्याचा शुभारंभ प्रा. प्रवीण दवणे यांच्या व्याख्यानाने झाला. या वेळी आयुक्त राजेश नार्वेकर, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, शहर अभियंता  संजय देसाई व्यासपीठावर उपस्थित होते.

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी मराठी भाषेचा गौरव वाढवित प्रचार व प्रसार करणारे तसेच कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर वाढविणारे विविध उपक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित करण्यात आले आहे.

**अधिकारी, कर्मचाऱ्यांना तीळगुळ वाटप**

दरम्यान, मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून या वेळी स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशातील उंचावलेले मानांकन तसेच सर्वोच्च सेव्हन स्टार रेटींगची प्राप्ती हा आनंदाचा गोडवा साजरा करण्यासाठी सफाईकर्मीसह, अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तसेच सर्व उपस्थित विभागप्रमुख व अधिकारी, कर्मचारीवृंदास तीळगूळ वाटप करण्यात आले.

## निवडक

### एनएनएस शिबिराचा समारोप



**रोहे** : तालुक्यातील एम. बी. मोरे महिला महाविद्यालय धाटाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) विभागांतर्गत सात दिवसीय श्रमसंस्कार निवासी शिबिराचा समारोप रविवारी (दि. १४) झाला. सात दिवसीय शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी आपले अनुभव सांगितले. शिबिरात प्रत्येक संघाच्या कामगिरीनुसार सर्वोत्कृष्ट स्वयंसेविका निवडण्यात आली. यात सदिया शेख (कला), अंकिता कान्हेकर (विज्ञान) आणि प्रिया भोईर (विज्ञान) यांची निवड करण्यात आली. शिबिराच्या समारोपला संस्थेचे संचालक उत्तमराव मोरे, प्राचार्य प्रसन्ना म्हसळकर, रोठ ग्रामपंचायतीचे सरपंच नितीन वारंगे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, ग्रामस्थ वसंत साळुंखे, नीता मोरे, कर्मचारी उद्देश वाडकर, एनएनएस विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर पाखर, प्रा. दीपाली वारंगे, प्रा. रमा देशमुख, कर्मचारी प्रसाद मोरे, किशोरी रटाटे आणि ५० स्वयंसेविका उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएनएस स्वयंसेविका प्रिया भोईर व राजेश्री म्हात्रे यांनी केले.

### शुभम भेकरेने साकारले श्रीरामाचे चित्र

**म्हसळा** : तालुक्यातील मौजे जांभूळगावातील शुभम भेकरे (वय १९) याने जांभूळगावात शाळेच्या पटांगणात ५१२ चौरस फुटात भव्य श्रीरामाचे चित्र काढले आहे. हे चित्र बनविण्यासाठी ५४० कोरे पेपर वापरण्यात आले. हे चित्र काढण्यासाठी त्याला सलग ५०० तास लागले. कोणतेही आर्थिक सहाय्य नसताना स्वखर्चाने त्याने हे चित्र काढले आहे. हे भव्य चित्र काढून विश्वविक्रम ठरणार असे त्यांनी सांगितले आहे कारण या अगोदर ५०९ चौरस फुटात चित्र काढण्यात आले होते. या वेगळ्या विक्रमाची संपूर्ण जिल्ह्यात चर्चा असून हे चित्र पाहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# पर्यटनातून रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील

## खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन; तांबडी धरणाचे भूमिपूजन

**रोहे : प्रतिनिधी**

तांबडी धरणाला ९६ सालात मान्यता मिळाली होती, परंतु वनजमिनीमुळे प्रकल्पाला उशीर झाले. आता या प्रकल्पासाठी ३५ एकरच्या आसपास भूसंपादन होणार आहे. या धरणामुळे पिण्याच्या पाण्याचा साठा तांबडी परिसरातील गावांना उपलब्ध होणार आहे. धरणाचा उपयोग सिंचनासाठीही होणार आहे. परिसरात रोजगाराची साधने उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न आम्ही करीत आहोत. त्यामुळे पर्यटक संख्या वाढणार आहे. या धरणाला आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल. रोहापासून हनुमान टेकडी, तांबडीमार्गे पुढे म्हसळापर्यंत होणाऱ्या रस्त्याला निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.





मृदा व जलसंधारण विभाग यांच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या तांबडी लघुपाटबंधारे योजनेंतर्गत धरणाच्या कामाचे भूमिपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, जगन्नाथ कुंडे, किसनराव मोरे, सरपंच उद्धेश देवघरकर, नवनीत डोलकर, किरण मोरे, हरेश नायनेकर, सरपंच परशुराम पवार आदी उपस्थित होते.

या वेळी जलसंधारण विभागाचे अण्णा कदम कदम यांनी, लघुपाटबंधारे योजनेंतर्गत सर्वेक्षण आधीपासूनच झाले आहे. या प्रकल्पासाठी १० कोटी निधी उपलब्ध असून भूसंपादनासाठी अजून १५ कोटी आवश्यकता असल्याचे सांगितले. संबंधित सर्व बाबींची पूर्तता लवकरात होणार असल्याचे सांगितले. या धरणास कालवा प्रस्तावित असून या धरणाचा उपयोग या परिसरातील गावांना होणार आहे, असे शेवटी सांगितले.

### असे आहे प्रकल्पाचे स्वरूप

*तांबडी लघुपाटबंधारे योजना असे या प्रकल्पाचे नाव असून या धरणाची लांबी २९० मीटर असून उंची ३०.५९ मीटर आहे. या धरणक्षेत्रात १५७६ स.घ.मी.पाणीसाठा उपलब्ध होणार आहे. या धरणामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार असून १४४ हेक्टर परिसर सिंचनाखाली येणार आहे. यातून उजवा कालवा ४.२५ किमीचा असणार आहे. या बंधाऱ्याचा लाभ या परिसरातील तांबडी, घोसाळे, कवळठे या गावांना होणार आहे.*

# महामार्गावरील झाडे सुकली

## पाण्याअभावी गंडांतर



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर खालापूर ते खोपोली बोरघाट पायथा अशा सहा किमी अंतराचे चौपदरीकरणाचे काम वर्षांपूर्वी करण्यात आले. या रस्त्यावरील दुभाजकांमध्ये फुले व शोभेची झाडे लावण्यात आली, मात्र या झाडांना मागील वर्षी पाणी न घातल्याने सुकून गेली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने जून २०२३मध्ये नव्याने झाडे लावली, मात्र पावसाळा संपताच ही झाडे पाण्याविना करपली आहेत. ऑक्टोबरमध्ये पडलेल्या अवकाळी पावसाने काही झाडांनी तग धरला, मात्र त्यानंतर पाणीच न मिळाल्याने उरलीसुरली झाडेही करपून गेली आहेत.

याबाबत रस्ते विकास महामंडळाचे अभियंता डी. ई. काजरेकर यांनी, या मार्गाचे हस्तांतरण ठेकेदाराकडून आयआरबीकडे दोन महिन्यांपूर्वी करण्यात आले आहे. याची जबाबदारी त्यांनी घेणे आवश्यक असून झाडे सुकली असतील तर पुन्हा लावून घेऊ, असे सांगितले.

### माणगावात स्नेहसंमेलन

**माणगाव** : तालुक्यातील काजल डान्स अकॅडमीचे वार्षिक स्नेहसंमेलन सोमवारी (दि. २२) अशोकदादा साबळे विद्यालय येथे आयोजित करण्यात आले आहे.

या स्नेहसंमेलनास नागरिकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमास माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष राजेश मेहता यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# चौल रामेश्वरनजीक मुख्य रस्त्याची दुरवस्था

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलच्या श्री रामेश्वरनजीक मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अत्यंत धोकादायक झाला आहे. त्यामुळे अपघाताची शक्यता असून या रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे.

श्री रामेश्वरनजीक पोहा मिलजवळील मुख्य रस्त्याचा काही भाग डांबर वाहून गेल्याने खडबडीत व खोलगट खड्डा तयार झाला आहे. या रस्त्यावर अनेकदा दुचाकी, रिक्षा, मिनीडोर वाहनांचा अपघात झाला आहे. या दुरवस्था झालेल्या रस्त्याच्या कडेला संरक्षक कठडे नसलेली मोरी असून वाहने खड्डा चुकविताना या मोरीत पडून गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या रस्त्याची लवकरात लवकर दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे.





**अलिबाग : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची रेवदंडा येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या वेळी मनसे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.**

### विज्ञान प्रदर्शनात नवघर शाळेचे यश

**पाली** : सुधागड तालुक्याचे ५१वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन सुएसो माध्यमिक विद्यालय खवली येथे झाले. या प्रदर्शनात नवघर शाळेतील इ. आठवीची विद्यार्थिनी आर्या वाघमारे हिने नावीन्यपूर्ण गाव हे मॉडेल बनवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या प्रतिकृतीसाठी शाळेतील शिक्षक प्रमोद म्हात्रे, अशोक कुंवर, श्रावस्ती जाधव, आर्यन चव्हाण, कुणाल पाटील या विद्यार्थ्यांनी आर्या वाघमारे हिला प्रतिकृती बनण्यासाठी सहकार्य केले.

# पतसंस्थांनी सुविधांमध्ये नावीन्यता आणावी

## जिल्हा सहकार भारतीचे अध्यक्ष अमित ओझे यांचे प्रतिपादन

**मुरूड : प्रतिनिधी**






पतसंस्थांमध्ये ठेवींचा ओघ हा केवळ व्याजदर अधिक, संचालक मंडळाची सचोटी, विश्वासार्हता यामुळे वाढत असतो. पतसंस्थांकडे युवा पिढीला आर्कषित करण्यासाठी युपीआय, फोन पे, एनईएफटीसारख्या नवनवीन प्रणाली विकसित करावी, असे आवाहन रायगड जिल्हा सहकार भारती अध्यक्ष अमित ओझे यांनी केले.

जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित मुरूडतर्फे वर्धापन दिनी आयोजित स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. या वेळी केशव स्मृती पतसंस्थेचे अध्यक्ष अमित ओझे, जय श्रीराम संस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, उपाध्यक्ष मेघराज जाधव, चंपावती ग्रामीण पतसंस्थेचे व्यवस्थापक विजय मानकर, कोषाध्यक्ष बाळकृष्ण कासार, सचिव सुनील विरकुड, संचालक डॉ. संजय पाटील, गणेश ठोसर, सिद्धेश गद्रे, समीर उपाध्ये, जयश्री जोशी, अश्विनी पाटील, सरव्यवस्थापक संजय ठाकूर आदी उपस्थित होते.

या वेळी सत्यनारायण महापूजा तसेच तिळगुळ वाटप करण्यात आले.

# सुधागडातील उन्हेरे गरम पाण्याचे कुंड ठरतेय आकर्षण





## पर्यटक व सहलीच्या विद्यार्थ्यांची गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीपासून अवघ्या तीन किमीवर असलेले उन्हेरे गरम पाण्याचे कुंड म्हणजे निसर्गाचा चमत्कारच आहे. पृथ्वीच्या गर्भातून येणारे हे गंधकमिश्रित पाणी शरीरासाठी आरोग्यदायीदेखील आहे. सध्या थंडीत या गरम व आरोग्यदायी पाण्याचा नागरिक, पर्यटक व सहलीला येणारे विद्यार्थी मनसोक्त आनंद घेतांना दिसत आहेत.

सर्व ऋतूंमध्ये स्नानासाठी गरम पाण्याची योजना नियतीने उन्हेरे या गावी केली आहे. या गंधकमिश्रीत उष्णोदक पाण्याच्या कुंडात स्नान केल्यास त्वचेचे विकार, सांधेदुखी आदी आजार बरे होण्यास लाभदायी ठरते. म्हणूनच स्नानाबरोबरच आरोग्य राखण्यासाठीसुद्धा या पाण्याचा उपयोग होत असतो. त्यामुळे सर्व ऋतूंमध्ये गरम राहणाऱ्या पाण्याच्या कुंडात स्नानासाठी येथे राज्यभरातून अनेक पर्यटक येत असतात. हिवाळ्यात पर्यटकांबरोबरच शालेय सहलीसुद्धा येथे मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे उन्हेरे गरम पाण्याचे कुंड हे स्थळ सध्या पर्यटकांनी बहरलेले दिसत आहेत.

येथे एकूण तीन कुंड आहेत. त्यातील एक कुंड थंड पाण्याचे आहे, तर उर्वरित दोन कुंड गरम पाण्याचे आहेत. यापैकी थंड पाण्याचे व त्याच्या शेजारी असलेले गरम पाण्याचे कुंड उघड्यावर आहेत. तेथे दगडी बांधकाम केले आहे. या गरम पाण्याच्या कुंडला खाली सुरक्षेच्या दृष्टीने लोखंडी जाळी बसविण्यात आली आहे. त्यामुळे कोणी बुडण्याचा धोका नाही. या दगडी कुंडातील पाणी जास्त गरम असते, तर दुसरे कुंड मोठे आहे.

हे कुंड बंदिस्त असून त्यामध्ये महिला व पुरुषांसाठी दोन भाग केले आहेत. या कुंडाला खाली लाकडी फळ्या बसविण्यात आल्या असल्याने येथेही कोणी बुडण्याचा धोका नाही.

### निसर्गरम्य वातावरण

***कुंड परिसरात विठ्ठलाचे मंदिर आहे. सभोवताली वृक्षराजी आहे. कुंडांच्याच्या समोर काही अंतरावर अंबा नदी वाहते. पाठीमागून उन्हेरे धरणाचा पाणी वाहते. बाजूला शेती आहे. फार रहदारी नाही, असे निसर्गरम्य आल्हाददायक वातावरण येथे आहे.***

### इतर सोयी सुविधा

*सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून काही वर्षांपूर्वी या कुंडाच्या भोवती टाईल्स लावून रंगरंगोटी करण्यात आली, परंतु येथील कपडे बदलण्यासाठी असलेल्या खोलीची दूरवस्था झाली आहे. सध्या ती कुलूप लावून बंद केली आहे. कुंड परिसरात जेवण, चहा, पाण्यासाठी हॉटेल आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह आहे. येथे शेजारीच स्वच्छतागृह व स्नानगृह आहेत. वाहने उभी करण्यास पार्किंगची सुविधा आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून येथे एक सभागृहदेखील बांधण्यात आले आहे. शिवाय ट्रस्टतर्फे विविध सोयीसुविधा पुरविल्या जातात. स्वच्छता राखली जाते.*

# रोह्यातील वक्तृत्व स्पर्धेला युवाशक्तीचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे सुपुत्र स्व. डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त विविध युवक संस्थांच्या सहभागातून तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. युवा शक्तीकडून होणारे विचारमंथन ऐकण्यासाठी रोहेकरांनी ऐतिहासिक राममारुती चौकात गर्दी केली होती.

सुराज्य प्रतिष्ठान, अभिनव रोहा, शिवचरण मित्रमंडळ, स्पंदन नाट्य संस्था, मावळा प्रतिष्ठान, राजमुद्रा फाउंडेशन, श्रीकृपा फाउंडेशन, रोटरी क्लब, रोट्रॅक्ट क्लब, रोहा युवा आदी युवा संस्थांच्या सहयोगातून रोहा प्रेस क्लब आणि तालुका युथ फोरमच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत २३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. खुल्या गटात श्रवण कदम प्रथम, भरत चौधरी द्वितीय, केतन गुप्ता तृतीय, निकिता बोथरे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. लहान गटात साहिल मोटे प्रथम, तेजस मगुतकर द्वितीय, आर्या शेळके तृतीय आणि आदिती वाटवे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. प्रा. एस. डी. पाटील, टी. पी. मोकल आणि रवींद्र कान्हेकर यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

पारितोषिक वितरण ज्येष्ठ पत्रकार दिलीप वडके, रोहा सिटिझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, वत्सराज सर, पत्रकार अरुण करंबे, पांडुरंग सरफळे रावसाहेब, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरीवले, गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, वाचनालयाचे अध्यक्ष किशोर तावडे यांच्या हस्ते करण्यात आले. निनाद शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर राजेंद्र जाधव यांनी आभार मानले.



# सुमित नागलची ऐतिहासिक कामगिरी

## ऑस्ट्रेलिया ओपनमध्ये अग्रमानांकित खेळाडूचा केला पराभव

**सिडनी : वृत्तसंस्था**

सुमित नागल याने ऑस्ट्रेलिया ओपन टेनिस स्पर्धेत इतिहास रचला आहे. सुमितने ऑस्ट्रेलिया ओपनच्या पहिल्याच टप्प्यात ऐतिहासिक कामगिरी करीत सिंगल्स ग्रँड स्लॅममध्ये अलेक्जेंडर बुब्लिक याचा ३-०ने पराभव केला.

सुमित याने पहिल्या सेटपासूनच वर्चस्व मिळवले आणि अलेक्जेंडरला ६-४, ६-२, ७-६(५) अशी सरळ तीन सेटमध्ये धूळ चारली. भारताच्या टेनिस इतिहासात सिंगल्स ग्रँड स्लॅममध्ये ३५ वर्षांत पहिल्यांदाच आपल्यापेक्षा जास्त रँकिंग असणाऱ्या खेळाडूचा भारतीय खेळाडूने पराभव केलाय. सुमितची एटीपी रँक १३७, तर अलेक्जेंडरची रँक ३१ इतकी आहे.

भारतीय टेनिससाठी सुमित नागलचा विजय ऐतिहासिक ठरला. सुमितच्या आधी रमेश कृष्णन याने सिंगल्स ड्रॉमध्ये



सीडेड खेळाडूचा पराभव केला होता. १९८९नंतर आता सुमितने सीडेड खेळाडूचा पराभव केला आहे. या विजयामुळे सुमित ऑस्ट्रेलिया ओपनमध्ये दुसऱ्या फेरीत पोहचला आहे.

सुमितने शानदार सुरुवात करीत पहिल्या सेटपासूनच वर्चस्व गाजवले. त्याने तीन वेळा अलेक्झांडरची सर्व्हिस तोडली आणि पहिला सेट ६-४ अशा फरकाने सहज जिंकला. दुसरा सेट त्याने ६-२ अशा फरकाने जिंकला. त्यानंतर तिसरा सेटही ७-६ असा जिंकत सामना आपल्या नावावर केला.

ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या सुमित नागल याच्यावर कौतुकाचा वर्षाव होतोय. सोशल मीडियावर सुमितच्या विजयाचा व्हिडीओ व्हायरल झालाय. या व्हिडीओत विजयानंतर सुमितचा आनंद स्पष्ट दिसत आहे. विजयानंतर सुमितने अलेक्जेंडर बुब्लिक याच्यासोबत हात मिळवल्याचेही पहावयास मिळते, तर चाहत्यांकडून सुमितच्या विजयाचा जल्लोष केल्याचे दिसतेय.

सुमितने दुसऱ्यांदा ग्रँडस्लॅमची मुख्य फेरी जिंकली आहे. याआधी २०२०च्या यूएस ओपनमध्ये तो मुख्य ड्रॉमध्ये एक सामना जिंकण्यात यशस्वी ठरला होता. टेनिस क्रमवारीत अव्वल १००मध्ये स्थान मिळवणाऱ्या खेळाडूला त्याने सातव्यांदा पराभूत केले आहे. त्याचबरोबर विरोधी खेळाडूच्या क्रमवारीत सुमितचा हा दुसरा मोठा विजय आहे.

# पनवेलमध्ये नमो चषक फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात नमो चषक फुटबॉल स्पर्धा सुरू झाली आहे.

पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते मंगळवारी (दि.१६) आले. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारूशिला घरत, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, महिला मोर्चा शहराध्यक्ष राजश्री वावेकर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, प्रशांत शेटे, प्रतिभा भोईर, प्रेमा भोपी, सोनाली सावंत, अभिषेक भोपी आदित्य भगत, तेजस जाधव आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत रायगड वि. मुंबई सलामीची लढत

**मुंबई : प्रतिनिधी**

मिडलाईन स्पोर्ट्स रायगड विरुद्ध जय दत्तगुरू कबड्डी संघ मुंबई शहर या रंगतदार लढतीने अमरहिंद मंडळ आयोजित स्व. उमेश शेनॉय स्मृती चषक राज्यस्तरीय पुरुष कबड्डी स्पर्धेचा प्रारंभ होईल. मुंबईतील दादर गोखले रोड (प.) येथील मंडळाच्या पटांगणात मॅटच्या क्रीडांगणावर बुधवारी (दि.१७) सायंकाळी ४ वा. ही स्पर्धा होईल.

मंडळाचे माजी कार्यवाह व कबड्डी संघाचे माजी संघनायक रंजन पडते यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. सामने एकाच क्रीडांगणावर खेळविण्यात येणार असल्याने १६ सहभागी संघांची पाच गटांत विभागणी करण्यात आली आहे.

अ गटात मिडलाईन स्पोर्ट्स रायगड, जय दत्तगुरू कबड्डी संघ मुं. शहर, विजय स्पोर्ट्स क्लब ठाणे; ब गटात बाबुराव चांदेरे फाउंडेशन पुणे, शिवशंकर मंडळ ठाणे, ओम् पिंपळेश्वर मंडळ मुंबई शहर; क गटात विजय क्लब मुंबई शहर, जॉली स्पोर्ट्स मुंबई उपनगर, अंकुर स्पोर्ट्स मुंबई शहर; ड गटात लायन्स स्पोर्ट्स मुंबई शहर, श्री विठ्ठल मंडळ ठाणे, बंड्या मारुती मंडळ आणि ई गटात जय भारत क्रीडा मुंबई शहर, गोलफादेवी सेवा मुंबई शहर, श्री राम कबड्डी संघ पालघर, ओवाळी क्रीडा मंडळ मुंबई उपनगर या संघांचा समावेश आहे.

# कळंबोली येथे राज्यस्तरीय कराटे तायक्वांदो स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मर्द मावळे राज्यस्तरीय खुली कराटे, तायक्वांदो, मार्शल आर्ट स्पर्धा २१ जानेवारी रोजी कळंबोली येथील पोलीस मुख्यालय स्पोर्ट्स हॉलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे आयोजन भूपेंद्र मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोवायडर, इंडिया ब्लॅक बेल्ट असोसिएशन आणि डायनॅमिक युथ स्पोर्ट्स अकॅडमी इंडिया यांच्या वतीने करण्यात आले आहे. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करीत सर्वांत जास्त पदके पटकाविणाऱ्या संघास व प्रशिक्षकास महाराष्ट्राचे मर्द मावळे म्हणून शिवकालीन मानाची ढाल देऊन गौरविण्यात येणार आहे. वैयक्तिक बक्षीस म्हणून दोन खेळाडूंना चांदीचा कडा देण्यात येईल. याशिवाय प्रत्येक संघ, प्रशिक्षकाला फिरती ढाल, शाल, श्रीफळ, फेटा, छत्रपती शंभूराजे यांच्या चित्राचे सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन नवी मुंबई पोलीस विभाग क्रीडा प्रमुख संपत्ती येळकर यांच्या हस्ते, तर पारितोषिक वितरण ग्रँड मास्टर सी.एल. बिंद यांच्या हस्ते होणार आहे.


### ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा

# मेदवेदेव, त्सित्सिपास विजयी; ओसाका, मार्केटा गारद

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

जवळपास दीड वर्षानंतर एखाद्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत खेळणाऱ्या जपानच्या नाओमी ओसाकाचे ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेतील आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले. फ्रान्सच्या १६व्या मानांकित कॅरोलिन गार्सियाने ओसाकाला सरळ सेटमध्ये पराभूत केले. पुरुष विभागात डॅनिल मेदवेदेव आणि स्टेफानोस त्सित्सिपास यांनी आपल्या मोहिमेची विजयी सुरुवात केली.

ओसाकाने गार्सियाला दोन्ही सेटमध्ये झुंज देण्याचा प्रयत्न केला, मात्र ती पूर्णपणे लयीत दिसली नाही. अखेरीस गार्सियाने या सामन्यात



६-४, ७-६ (७-२) अशी बाजी मारली. त्याचप्रमाणे गतवर्षी विम्बल्डनचे जेतेपद पटकावणाऱ्या चेक प्रजासत्ताकच्या मार्केटा वोन्ड्रोउसोवलाही पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. वोन्ड्रोउसोवाला युक्रेनच्या दयामा यास्त्रेमस्का हिच्याकडून १-६, २-६ अशी हार पत्करावी लागली.

पुरुषांमध्ये तिसरा मानांकित मेदवेदेव आणि सातवा मानांकित त्सित्सिपास यांनी अपेक्षित सुरुवात केली. मेदवेदेवला बिगरमानांकित फ्रान्सच्या टेरेन्स अॅट्मानेविरुद्ध पुढे चाल मिळाली. मेदवेदेव ५-७, ६-२, ६-४, १-० असा आघाडीवर असताना टेरेन्सने दुखापतीमुळे माघार घेतली. त्सित्सिपासलाही पहिला सेट गमावल्यानंतर पुनरागमन करण्यात यश आले. त्सित्सिपासने बिगरमानांकित बेल्जियमच्या झिझू बर्ग्सवर ५-७, ६-१, ६-१, ६-३ असा विजय मिळवला.

चौथ्या मानांकित अमेरिकेच्या कोको गॉफने ऑस्ट्रेलियन स्पर्धेची दमदार सुरुवात करताना पहिल्या फेरीत स्लोव्हाकियाच्या अॅना कॅरोलिना श्मिडलोव्हाला ६-३, ६-० असे नमवले. गतवर्षी अमेरिकन खुली स्पर्धा जिंकणाऱ्या १९ वर्षीय गॉफसमोर दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्याच कॅरोलिन डोलहिडेचे आव्हान असेल. सहाव्या मानांकित ओन्स जाबेऊरने युक्रेनच्या युलिया स्टारोदुबत्सेवाचा ६-३, ६-१ असा पराभव केला.

### आज भारत वि. अफगाणिस्तान तिसरा टी-२० सामना

## संजूला मिळू शकते संधी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटचा सामना जिंकून भारताला विजयी घोडदौड कायम राखायची असून मालिकेत क्लीन स्वीप करायचा आहे. दुसरीकडे अफगाणिस्तानला या सामन्यात पुनरागमन करून शेवट गोड करीत मायदेशी परतायचे आहे.

अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी संजू सॅमसनचाही भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे, मात्र दोन्ही सामन्यांत त्याचा समावेश झाला नाही. त्याच्या जागी दुसरा यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्माला संधी देण्यात आली. आता जितेशला विश्रांती देऊन तिसऱ्या सामन्यात संजूचा समावेश होण्याची शक्यता आहे.

# बीसीसीआयने राष्ट्रीय निवडकर्ता पदासाठी मागवले अर्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) मुख्य निवड समितीमध्ये आगामी काळात बदल दिसू शकतात. बीसीसीआयने राष्ट्रीय निवडकर्ता पदासाठी अर्ज मागवले आहेत.

अजित आगर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीमध्ये एकूण पाच सदस्य आहेत. सध्या एकही जागा रिक्त नाही. त्याचबरोबर एकाही सदस्याचा कार्यकाळ पूर्ण झालेला नाही. अशा स्थितीत सध्याच्या निवड समितीतील कोणाला तरी बाहेरचा रस्ता




दाखवला जाऊ शकतो, असे मानले जात आहे.

बीसीसीआयने या पदासाठी काही अटीशर्ती ठेवल्या आहेत. बोर्डाने म्हटले आहे की, निवडकर्ता पदासाठी सात कसोटी आणि ३० प्रथम श्रेणी सामने खेळण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. या पदासाठी २५ जानेवारीपर्यंत अर्ज भरता येतील. इच्छुकांनी २५ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत अर्ज करावेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर बीसीसीआय शॉर्टलिस्ट केलेल्या अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलावेल. आतापर्यंत मुलाखतीची तारीख निश्चित केलेली नाही.


सध्याच्या निवड समितीमध्ये अजित आगरकर मुख्य निवडकर्ता आहेत. त्याच्याबरोबर माजी सलामीवीर फलंदाज शिव सुंदर दास, माजी वेगवान गोलंदाज सुबार्तो बॅनर्जी, सलील अंकोला आणि माजी फलंदाज श्रीधरन शरथ आहेत. आगरकर वगळता कोणत्याही एका व्यक्तीला नारळ दिला जाऊ शकतो. यात काही सदस्यांना या निवड समितीत खूप कालावधी झाला आहे.

**कळंबोली : पनवेल विधानसभा भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक महोत्सव अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. उद्घाटन समारंभास पदाधिकारी, कार्यकर्ते व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. या वेळी रायगड विरुद्ध ठाणे संघांत झालेली लढत आकर्षण ठरली.**









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com